20 March 2013

# – प्रश्नोपनिषद् –

## – शांतिमंत्र –

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिः
व्यशेम देवहितं यदायुः ॥
स्वस्ति नः इन्द्रः वृद्धश्रवाः
स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ।
स्वस्तिनस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः
स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

**अन्वय** - हे देवाः यजत्राः (वयम्) कर्णेभिः भद्रं शृणुयाम, अक्षभिः भद्रं पश्येम । स्थिरैः अङ्गैः तनूभिः तुष्टुवांसः (वयम्) यद् आयुः (तद्) देवहितं व्यशेम । वृद्धश्रवाः इन्द्रः नः स्वस्ति दधातु । विश्ववेदाः पूषा नः स्वस्ति (दधातु) अरिष्टनेमिः तार्क्ष्यः नः स्वस्ति (दधातु) बृहस्पतिः नः स्वस्ति (दधातु) ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

**अर्थ** - कृतज्ञतापूर्वक जो केला जातो तो खरा यज्ञ । अशा कृतज्ञ भावनेने, श्रद्धेने आम्ही यज्ञ करणारे आहोत. देवांनो आम्ही कानांनी शुभच ऐकावे, डोळ्यांनी शुभच पहावे. (आमचा दृष्टिकोन सकारात्मक असावा) त्यामुळे शरीरही सुदृढ होईल - आम्हाला जे आयुष्य मिळाले आहे ते आम्ही देवकार्यात घालवू. ज्या गोष्टी देवांना प्रिय आहेत त्याच आम्ही करू. ज्याचे यश सर्वदूर पसरलेले आहे असा इंद्र आमचे कल्याण करो. या जगात निर्माण झालेल्या प्रत्येक गोष्टीचे ज्ञान असणारा पूषन म्हणजे सूर्यदेव, जगाचा पोषणकर्ता आमचे कल्याण करो.



© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

तात्पर्य-

अरिष्टांचा भेद करणारा गरुड आमचे हित करो, बुद्धीचा अधिपती बृहस्पती आमचे कल्याण करो.

त्रिविध तापांपासून- अधिभौतिक, अधिदैविक, आध्यात्मिक- आमचे रक्षण करो. आमच्या या कार्यात देवतांनी आमचे रक्षण करावे. आम्हाला सहाय्य करावे. आमचे कल्याण करावे.

या प्रार्थनेत जी विनंती केली आहे तिचा क्रमही मोठा मनोवेधक आहे.

आपण अधिक ऐकतो व कमी पहातो. पहाण्याच्या शक्तीला मर्यादा आहेत. त्यामानाने ऐकण्याची शक्ती अधिक आहे. म्हणून यात श्रोत्र प्रथम व अक्ष नंतर आले आहे. आणि जे ऐकू त्यातील शुभच ध्यानात घ्यावे. आमचा सकारात्मक दृष्टीकोन असावा. भाराभार कानावर पडले तरी त्यातील शुभ गोष्टीच ध्यानात ठेवाव्यात किंवा वाईटातूनही चांगलेच वेचून घ्यावे. कबीर म्हणतात- निंदक नियरे राखिये आंगन कुटी छवाय। बिन पानी बिन साबुन के निर्मल करे सुभाय।। सकारात्मक दृष्टीकोनाने आलेल्या प्रसंगाने चित्त क्षुब्ध न होता शांतपणे त्यातून मार्ग काढता येतो.

शरीर सुदृढ असेल तर मन स्वस्थ असते. कोणतेही कार्य करण्यासाठी शरीर व मन स्वस्थ हवे. देवांना प्रिय असणाऱ्या गोष्टीच आम्ही करू. इंद्र आमचे कल्याण करो. सूर्यामुळेच ऋतु आहेत. शेती आहे, वृष्टी आहे. बुद्धीचा अधिपती बृहस्पती आमचे कल्याण करो. गुरूला समजावून सांगण्याची शक्ती आणि शिष्याला आकलनशक्ती व स्मरणशक्ती देणारा तोच आहे. आमच्या बुद्धीची प्रभा तेजस्वी असू दे.

© www.madhaveeraghuveer.com

॥ ॐ ॥

अथर्ववेदाच्या पिप्पलाद-शाखीय ब्राह्मणामध्ये हे उपनिषद आलेले आहे. याला ब्राह्मणोपनिषद ही म्हणतात. सुकेशा, सत्यकाम, सौर्यायणी, आश्वलायन, भार्गव व कबन्धी असे सहा ब्रह्मनिष्ठ ऋषी आपापल्या शंका घेऊन पिप्पलाद ऋषींकडे येतात. त्यांच्या आश्रमात एक वर्ष ब्रह्मचर्य पाळून राहिल्यानंतर त्यांनी सहा प्रश्न विचारले व पिप्पलादांनी त्यांची उत्तरे दिली. म्हणून याला प्रश्नोपनिषद असे म्हणतात.

भारतीकोशात पिप्पलाद ऋषींबद्दल अशी माहिती मिळते ते दधीचि ऋषी आणि वडवा प्रातिथेयीचे पुत्र. पिंपळाची फळे खाऊन रहाणारे म्हणून पिप्पलाद. हे अथर्ववेदाचे आद्य संकलनकर्ते. व्यासांच्या अथर्वशिष्य परंपरेतील देवदर्शाचे शिष्य. अतिशय विद्वान म्हणून ते प्रसिद्ध असावेत. व ऋषिसमाजात त्यांना खूप मान असावा, असे वाटते. दशरथ ऋषींनी रचलेल्या शनिस्तुतीमध्ये 'पिप्पलादांनीही ह्या शनीची महती गायली आहे' असा पिप्पलादांचा उल्लेख आढळतो.

हे सहा ब्रह्मनिष्ठ ऋषी त्यांना प्रश्न विचारतात.

(१) कबन्धी पहिला प्रश्न विचारतात—
भगवन् विश्वात या ज्या सर्व प्रजा दिसतात त्या कुणापासून व कशा निर्माण झाल्या?

(२) भार्गवाने दुसरा प्रश्न विचारला—
भगवन्, या निर्माण झालेल्या प्रजांमध्ये कुठले कुठले देव इंद्रिये म्हणून येऊन रहातात? व यातील श्रेष्ठ कोण?

(३) आश्वलायनाचा तिसरा प्रश्न असा आहे—
भगवन्, तुम्ही आता ज्या प्राणांचा महिमा सांगितला ते प्राण कुणापासून निर्माण होतात? तो प्राण शरीरात प्रवेश कसा करतो? स्वतःला विभागून सर्व शरीराचे कार्य कसे चालवतो? व का शरीरातून दुसऱ्या

© www.madhaveeraghuveer.com

शरीरात कसा जातो? म्हणजेच पुनर्जन्म कसा होतो?
हेच प्राण बाह्य जगात ही धारण करतात का? कसे?
अंतर्जगताचे धारण ते कसे करतात?

(४) सौर्यायणीने चौथा प्रश्न विचारला -
भगवन् हे शरीर जेव्हा झोपी जाते तेव्हा नेमके
कोण झोपतात? कोण जागतात? स्वप्न कोण पहातो?
आनंद कोणाला होतो? सर्व कुणाच्या आधाराने रहातात?

(५) सत्यकाम पाचवा प्रश्न विचारतात -
भगवन्, जो माणूस आयुष्यभर ओंकाराची उपासना
करतो, त्याला काय फळ मिळते? कुठला लोक मिळतो?

(६) यानंतर सुकेशा विचारतात.
मला कोसल देशाच्या राजपुत्राने - हिरण्यनाभाने
विचारले की तू षोडशकला पुरुष जाणतोस का?
मला त्याचे ज्ञान नव्हते म्हणून मी त्याला काही सांगू
शकलो नाही. तुम्ही मला ते ज्ञान द्या.

असे सहा ऋषींनी निरनिराळे सहा प्रश्न
विचारले. त्याची उत्तरे पिप्पलाद ऋषींनी काय दिली
याचे सविस्तर विवेचन म्हणजे हे प्रश्नोपनिषद

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

## प्रथम खण्ड

8 am ॐ सुकेशा च भारद्वाजः शैब्यश्च सत्यकामः सौर्यायणीच गार्ग्यः
कौसल्यश्चाश्वलायनो भार्गवो वैदर्भिः कबन्धी कात्यायनस्ते
हैते ब्रह्मपराः च ब्रह्मनिष्ठाः परं ब्रह्मान्वेषमाणाः एष
10 ह वै तत् सर्वं वक्ष्यति इति ते ह समित्पाणयो
भगवन्तं पिप्पलादम् उपसन्नाः ॥१॥

11 अर्थ- भारद्वाजाचा पुत्र सुकेशा, शिबिचा मुलगा सत्यकाम,
12 गर्गगोत्रात जन्मलेला सौर्यायणी, कोसल देशात रहाणारा
आश्वलायन, विदर्भ देशात राहणारा भार्गव, कत्य ऋषींचा
1 pm पणतु कबन्धी असे सहाजण ब्रह्मपरायण व ब्रह्मनिष्ठ
होते. त्यांना ब्रह्म जाणून घ्यायचे होते. त्यावर त्यांची
2 निष्ठा होती. त्याप्रमाणे त्यांचे आचरण होते. त्यांची
उपासना होती. त्यांनी परब्रह्माचा ध्यास घेतला होता. हे
3 भगवान पिप्पलाद आपल्याला सर्व सांगतील या विचाराने
हातात समिधा घेऊन ते पिप्पलादांकडे आले.

4 विवेचन- अयन म्हणजे गन्तव्य. परायण म्हणजे अंतिम ध्येय.
5 जाण्याचे ठिकाण. या सर्व ऋषींचे परायण ब्रह्म होते.
परब्रह्म जाणून घेण्याची त्यांना ओढ होती. त्याविषयी ते
6 आपापसांत चर्चा करतच असतात. पण त्यांना नेमके
मर्म सापडत नव्हते. पिप्पलाद ऋषींची कीर्ति त्यांनी
7 ऐकली होती म्हणून जिज्ञासेने ते त्यांच्याकडे आले.
शिष्यभावाने कुणाकडे जाताना त्यांच्या उपयोगाची
त्यांना हवी असलेली वस्तु नेली तर ते चटकन प्रसन्न
होतात. व गुरु प्रसन्न झाला तर विद्या भरभरून
मिळते हा भाव असतो म्हणून गुरुकडे समिधा घेऊन
जाणे हा उपचार झाला होता. यज्ञयाग, होमहवन हे
नित्यकर्म असे. त्यासाठी समिधा वाळलेल्या लागत असत.



©www.madhaveeraghuveer.com

23 TUE FEB 2010

Wk 08, 054-311

*Priority*

February 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

8 am दुसरा एक अर्थ असा आहे की समिधा हे वासनांचे
प्रतीक आहे. साधकाच्या मनावर अनेक जन्मांचे संस्कार
9 असल्यामुळे मनामध्ये ऐहिक व पारलौकिक अनंत कामना
असतात. या कामना म्हणजेच समिधा होय. मात्र या
10 समिधा ओल्या नसून शुष्क झालेल्या असतात. त्यातील
रस निघून गेलेला असतो. तसेच अंतःकरणातील
11 विषयरस नाहीसा झाल्यामुळे वासनाही शुष्क होतात.
साधकाच्या मनात वैराग्य निर्माण होते. व तो आत्मज्ञानाच्या
12 श्रवणासाठी योग्य अधिकारी होतो. म्हणून हे सहा शिष्य
हातात समिधा घेऊन विधिवत शरण गेले.

1 pm

2

3

4

5

6

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

27 March 2013

तान् ह स: ऋषि: उवाच
"भूय: एव तपसा, ब्रह्मचर्येण श्रद्धया संवत्सरं संवत्स्यथ यथाकामं प्रश्नान् पृच्छत। यदि विज्ञास्याम: सर्वं ह वः वक्ष्यामो इति ॥२॥

अर्थ - त्या सहा जणांना पिप्पलाद ऋषी म्हणाले "तुम्ही तप केलेले आहे. ब्रह्मचर्याचे नियम पाळून तुम्ही रहाणारे आहात तरी (पुन्हा) तुम्ही इथे या आश्रमात तप करीत ब्रह्मचर्याचे नियम पाळून श्रद्धेने एक वर्षभर रहा. त्यानंतर तुमची जी काही इच्छा असेल त्याप्रमाणे तुम्ही प्रश्न विचारा. जर मी त्या प्रश्नांची उत्तरे जाणत असेन तर (नक्कीच) तुम्हाला हातचे काही राखून न ठेवता सर्व सांगेन.

विवेचन - आचार्यांनी शिष्याची पारख केल्याशिवाय त्याला ज्ञान द्यायचे नसते. जर शिष्याची तयारी नसेल तर सांगून काही उपयोग नाही. उलट गोंधळ (बुद्धिभेद) मात्र व्हायचा. शिष्याची पात्रता व त्याचा उद्देश याची खात्री करून घेऊनच ज्ञान द्यावे. ज्ञानाचा आदर करण्यासाठी व गैरवापर टाळण्यासाठी ही खबरदारी घ्यायची.

त्या सहाही जणांची याला तयारी होती. त्यांची पिप्पलादांवर श्रद्धा होती. ते आपल्याला उत्तरे सांगतील यावर विश्वास होता व गुरूने जे करायला सांगितले ते करण्याची त्यांची तयारी होती. इतके दिवस आम्ही केलेल्या तपाचा, मिळवलेल्या ज्ञानाचा काहीच उपयोग नाही का? आता पुन्हा वेळ वाया का घालवायचा? शिवाय त्यांना उत्तर माहिती असली तर ते सांगणार. असे त्यांना वाटले नाही.

आणि पिप्पलादांनीही त्यांना खोट्या भ्रमात ठेवले नाही. अत्यंत विनम्रतेने जर आम्हाला ठाऊक असेल तर सांगू असे सांगितले. त्यात अहंभावाचा पूर्ण अभाव होता.

Birthday / Anniversary

8 am

अथ कबन्धी कात्यायन उपेत्य पप्रच्छ।
भगवन् कुतो ह वा इमाः प्रजाः प्रजायन्ते? इति॥३॥

9

अर्थ - एक वर्ष पूर्ण झाल्यावर भगवान पिप्पलादांनी

10 त्या सर्वांना एकत्र बोलावले. ते म्हणाले असणार -

"मी तुमच्यावर प्रसन्न झालो आहे. विचारा काय

11 विचारायचे आहे ते!" तेव्हा कत्य ऋषींचा पणतू

कबन्धी पुढे झाला व त्याने पहिला प्रश्न विचारला -

12 " भगवन या विश्वात दिसणाऱ्या ज्या असंख्य गोष्टी

असंख्य जीव आहेत. ते कुठून निर्माण झाले? यांचा

1 pm निर्माता कोण?"

विवेचन - हे दिसणारे स्थूल नामरूपात्मक विश्व कुठल्या

2 शक्तीपासून, वस्तूपासून निर्माण झाले? म्हणजे परब्रह्माचे

3 स्वरूपच कारणरूपाने विचारले आहे.

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

तस्मै स ह उवाच प्रजाकामः वै प्रजापतिः।
सः तपः अतप्यत। सः तपः तप्त्वा सः मिथुनम् उत्पादयते।
रयिं च प्राणं च इति एतौ मे बहुधा प्रजाः करिष्यतः इति॥४॥

अर्थ- त्या कबन्धी कात्यायनाला पिप्पलाद मुनी म्हणाले - प्रजेची इच्छा करणाऱ्या प्रजापतीने तप केले. त्याने तप करून रयि व प्राणाची निर्मिती केली. रयि व प्राण हे दोघे माझी अनेक प्रकारची प्रजा उत्पन्न करतील, असा त्याने विचार केला.

विवेचन- प्रथम सर्वत्र एकमेवाद्वितीय परब्रह्मच होते. ते असतचि असते म्हणजे ते नित्य असतेच. ते नाही अशी स्थितीच नाही. ते उत्पन्न होत नाही किंवा नाशही पावत नाही. मनात आणले तर काहीही करायची त्याच्यात शक्ती असते. एकदा त्याच्या मनात आले की जरा गंमत करावी. 'एकाकी न रमते। अहं बहुस्याम्।' एकट्याने काही मजा नाही. मीच अनेक रूपात प्रगट होतो. अशी त्याची निर्मितीची इच्छा झाल्यावर त्याची निर्मितीक्षमता कार्यरत झाली. तेच परब्रह्म प्रजाकामः झाले. त्याची निर्मितीक्षमता म्हणजे मूळमाया, अविद्या, प्रकृती इ० नावांनी आपण ओळखतो. सर्वात प्रथम प्रजापतीची निर्मिती केली. यालाच आपण हिरण्यगर्भ म्हणून ओळखतो. त्याला सांगितले -"चल खूप प्रजा निर्माण कर. छान खेळ मांडायचा आहे."

तेव्हा हिरण्यगर्भ विचारात पडला. मग त्याने ज्ञानमय तप केले. म्हणजे विश्व कसे असावे याबद्दल बराच काळ चिंतन केले. त्यानंतर त्याला असे वाटले की प्रजननासाठी दोघांची आवश्यकता आहे. मग त्याने प्राण आणि रयि हे मिथुन निर्माण केले. आणि प्रजांची उत्पत्ती करण्याचे काम त्यांच्यावर सोपवले.



© www.madhaveeraghuveer.com

प्राण म्हणजे चैतन्य, चित् शक्ती. तिला धारण करण्यासाठी कवच हवे. ते म्हणजे रयि. उर्जा नुसती कशी रहाणार? त्याला आवरण हवे. धारण करणारे काहीतरी हवे. म्हणजे Energy जर हवी, पण ती धारण करण्यासाठी Matter हवे. दोन्हींच्या संयोगाने निर्मिती होते.

पुरुष हा चैतन्य व स्त्री ही धारण करणारी. पुरुषाचे सार, तेज म्हणजे त्याचे वीर्य व ते धारण करणारी पोषण करणारी, त्या (वीर्याला) ला वाढवणारी ती स्त्री.

तेव्हा प्रथम ते मिथुन एक होते. अर्धनारी नटेश्वर स्वरूपात होते. पण व्यवहारासाठी दोन भाग करून त्यांचे कार्य सुरु झाले. रयि म्हणजे भोज्य व प्राण हा भोक्ता! रयि म्हणजे जडत्व, प्राण म्हणजे चैतन्य! जड व चेतन - मिळून विश्वाचा पसारा निर्माण होतो.



© www.madhaveeraghuveer.com

आदित्यः ह वै प्राणः रयिः एव चन्द्रमाः रयिः वा एतत्
सर्वं यत् मूर्तं च अमूर्तंच तस्मात् मूर्तिः एव रयिः ॥५॥

अर्थ - आदित्य हा प्राण आहे. सूर्याला जगताचा आत्मा म्हणतात. व्यवहारात सुद्धा सूर्य उगवला की दिनक्रम सुरु होतो. सर्वजण कामाला लागतात. वस्तूवस्तूतील भेद दिसू लागतो. सूर्याच्या उर्जेने वनस्पती उगवतात. सर्वत्र चैतन्य भरते. चंद्रमा हा रयि आहे. त्यात स्त्रीत्वाचे सर्व गुण आहेत. शांत, शीतल, कोमल व वात्सल्यपूर्ण. जे जे मूर्त-दृश्य व अमूर्त-अदृश्य आहे ते सर्व रयि आहे. म्हणून मूर्ति हेच रयि आहे.

विवेचन - येथे सूर्यालाच प्राण ही संज्ञा दिली आहे. तो प्राण अत्ता म्हणजे भोक्ता आहे. भोक्ता, अग्नि, सूर्य हे सर्व एकाच अर्थाचे शब्द आहेत. आणि अन्न हे चंद्रमा आहे. रयि, अन्न, सोम हे भोग्य आहे. अशा प्रकारे प्रजापतीने रयि व प्राण हे पहिले मिथुन निर्माण केले.
एकाच प्रजापतीपासून हे मिथुन - द्वंद्व निर्माण झाले आहे. त्यामुळे वस्तुतः भोग्य व भोक्ता एकच आहे परंतु निर्मितीनंतर ते दोन झाल्यासारखे वाटते. हा भेद वास्तविक नसून गुणप्रधानकृतः भेदः आहे. हा भेद गौण भाव व प्रधान भाव असा आहे. अन्न हे भोग्य असून प्राण हा भोक्ता आहे. चन्द्रमा हा भोग्य तर आदित्य हा भोक्ता आहे. पारमार्थिक दृष्टीने भोग्य व भोक्ता दोन्ही एकच आहेत. परंतु सृष्टीचे निरीक्षण केले तर एक भोगणारा भोक्ता हा दुसऱ्या भोक्त्याचे भोग्य होतो. जीवो जीवस्य जीवनम्। प्रत्येक भोग्याला एक भोक्ता आहे जो अन्य कुणाचे तरी भोग्य आहे. याप्रमाणे भोग्य - भोक्ता - भोक्ता असे खालून वर गेल्यास

© www.madhaveeraghuveer.com

| April 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

*Priority*

TUE **2**
MAR
2010

Wk 09, 061-304

8 am अंतिम भोक्ता हा प्रजापतिच आहे. तोच निरतिशय भोक्ता आहे. म्हणूनच भगवंत गीतेत म्हणतात.
9 अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च।

अर्थात -

10 अहं भोगतेनैव भोग्यं ना भोक्ता।
11 क्रिया पदार्थ उपभोक्ता

12

1 pm

2

3

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

अथाऽऽदित्य उदयन्प्राचीं दिशं प्रविशति तेन प्राच्यान् प्राणान् रश्मिषु सन्निधत्ते। यत् दक्षिणां यत् प्रतीचीं यत् उदीचीं यदधो यदूर्ध्वं यदन्तरा दिशो यत्सर्वं प्रकाशयति तेन सर्वान् प्राणान् रश्मिषु सन्निधत्ते॥ ६॥

अर्थ- सूर्याचा उदय झाल्यानंतर तो पूर्व दिशेस प्रवेश करतो. तो पूर्वेकडील प्राणांना आपल्या किरणांनी व्याप्त करतो. तसेच तो दक्षिण, पश्चिम, उत्तर, खाली, वर व अन्य दिशांना प्रकाशित करतो. आपल्या सर्व प्रकाशित किरणांनी तो सर्व प्राणांना व्याप्त करून प्रकाशमान करतो.

विवेचन- या मंत्रातील भाव असा आहे की सूर्य उदयाला येतो व पूर्वमध्ये प्रवेश करतो. तो आपल्या किरणांना प्राणशक्तीने भरून टाकतो. ते किरण स्वतः होऊनच पुढे पुढे सरकतात. व पूर्वच नव्हे तर पश्चिम, उत्तर दक्षिण वगैरे दाही दिशांना प्रकाशीत करतात. या सूर्यकिरणांची प्रभा सर्वत्र पसरलेली असते. या सूर्यकिरणातून व प्रभेतून सर्वांना उर्जा मिळते. व ते कार्यतत्पर होतात. व संध्याकाळी सूर्य जेव्हा ही किरणे आवरून घेतो, तेव्हा आपला उत्साह कमी कमी होतो व आम्हाला विश्रांतीची आवश्यकता वाटते. तेव्हा आम्ही झोपतो- विश्रांती घेऊन जेव्हा ताजेतवाने होतो पुन्हा दुसऱ्या दिवशी सूर्य उगवल्यावर उर्जायुक्त होऊन पुन्हा कामाला लागतो.

वास्तविक दिशा एकच! एका दिक! पण आपण सोयीसाठी तिचे विभाग पाडले. सूर्य उगवतो ती प्राची। त्याच्या विरुध्दची प्रतीची, डाव्या बाजूची उदीची, उजव्या बाजूची दक्षिण, मधल्या कोनांच्या उपदिशा, वर व खाली अशा आम्ही दहा दिशा मानतो. सूर्य जरी प्राचीला उगवला तरी त्याची स्वसारा:- स्वतः पुढे पुढे सरकणारी उर्जायुक्त किरणे सर्व बाजूंचा कण न कण

© www.madhaveeraghuveer.com

April 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

*Priority*

THU MAR 4 2010

Wk 09, 063-302

8 am त्यातून टाकतात व प्रत्येक कणात चैतन्य भरतात.
त्यामुळे सकाळ शांतीतवानी तर संध्याकाळ मंगलवाटते.
9 ज्यावेळी सूर्योदय होतो तेव्हा तो प्राणिमात्रांच्या
दृष्टीला गोचर होतो. सर्वांना आपल्या प्रकाशकिरणांमध्ये
10 सामावून घेऊन सर्वांना धारण करतो, प्रकाशमान करतो.
तो सर्व दिशांना, त्यामध्ये स्थित असणाऱ्या सर्व प्राणिमात्रांना
11 स्वतःचे रूप देतो.

12

1 pm

2

3

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

Priority

**March 2010**

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

8 am स एष: वैश्वानरो विश्वरूप: प्राण: अग्नि: उदयते।
तत् एतत् ऋचा अभ्युक्तम् ॥७॥

9 अर्थ - तो हा वैश्वानर (भोक्ता) विश्वरूप प्राण तोच
10 अग्निस्वरूप असून तोच उदय पावतो.

11 विवेचन - अशा रीतीने सूर्य व चंद्र हे समष्टि मिथुन
निर्माण केले. सूर्य आपल्या किरणात प्राणशक्ती भरून
12 पसरवतो. त्याला जगताचा आत्मा म्हणतात. जगातील प्रत्येक
प्राण्यात, पक्ष्यात, माणसात तो वैश्वानर बनून रहातो.
आपल्या पोटातील उब म्हणजेच हा वैश्वानर. तो प्रत्येक
1 pm जीवात आहेच. म्हणूनच भूक लागते. अन्न पचते. ऊर्जा
2 उत्पन्न होते. शरीराचे आवश्यक ते तापमान रहाते. आतील
सर्व पेशी कार्यक्षम रहातात. म्हणजे हा पोटातील अग्नीच
3 आम्हाला जिवंत ठेवतो. म्हणून त्याला प्राण म्हटले आहे.

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

विश्वरूपं हरिणं जातवेदसं परायणं ज्योतिः एकं तपन्तम् ।
सहस्ररश्मिः शतधा वर्तमानः प्राणः प्रजानाम् उदयति एषः सूर्यः ॥

अर्थ - विश्वरूप, प्रकाशक, सर्वज्ञ, सर्वांचा आश्रय, ज्योतिस्वरूप, अद्वय, तप्त होणारा असा हा सूर्य ब्रह्मज्ञानी लोक जाणतात. हा हजारो किरणांचा, शेकडो रूपांमध्ये स्थित असणारा, हा सर्व प्रजांचा प्राण असणारा हा सूर्य उगवतो.

विवेचन - या मंत्रात सूर्य व प्राण एक कसे आहेत हे दाखवून दिले आहे. हा सूर्य कसा आहे? तो विश्वरूप आहे. म्हणजेच तो संपूर्ण विश्वात व्याप्त आहे. तो हरिण म्हणजे किरणांनी युक्त आहे. हा सूर्य हा किरणांनी सर्वदूर चपळपणे पोहोचतो. प्रकाशाचा वेग विज्ञान सांगतेच. या विश्वात सर्वात वेगवान काय असेल तर तो 'प्रकाश' आहे. तो जातवेदस आहे. 'यद् यद् जातं तद् तद् वेत्ति।' म्हणजे निर्मित झालेल्या, जन्मलेल्या प्रत्येक वस्तूला संपूर्णपणे जाणणारा आहे. तो जगनिर्माण करतो. त्याला प्रत्येक वस्तू आतून बाहेरून संपूर्णपणे माहीत असते. परायण म्हणजे शेवटचे गन्तव्य! 'ई' धातुपासून अयन - मुक्कामाची जागा हा शब्द तयार झाला. परायण म्हणजे जाण्याचे शेवटचे आणि सर्वश्रेष्ठ ठिकाण! माणूस सूर्यापर्यंत पोहोचला की परमेश्वराच्या दाराशी पोहोचला. सूर्य हा 'ज्योतिरूप' आहे. तेज, प्रकाश आपल्याला त्याच्यापासूनच मिळतो. एकं तपन्तम् - आम्हाला आवश्यक ती उष्णता देणारा तो एकच आहे.

हा सूर्य ज्ञेय - जाणण्याचा विषय आहे. या वाक्यातील सर्व विशेषणे द्वितीया विभक्तीत आहेत. मात्र दुसऱ्या ओळीतील त्याच सूर्याची विशेषणे प्रथमा विभक्तीत आहेत. पहिल्या ओळीत ब्रह्मज्ञानी हा ज्ञाता असून सूर्य हे



© www.madhavberaghuveer.com

ज्ञेय आहे. मात्र हा ब्रह्मज्ञानी पुरुष स्वतःपासून सूर्याला भिन्न न पाहता प्रत्यगात्मस्वरूपाने जाणतात. म्हणजेच विश्वरूप, प्रकाशक, सर्वज्ञ, सर्वांचा आश्रय, ज्योतिस्वरूप, सर्वांना तप्त करणारा सूर्य हा मीचेच आत्मस्वरूप आहे. तो सूर्य व मी अद्वय आहोत. मग तो सूर्य कोण आहे त्याची विशेषणे दुसऱ्या ओळीत प्रथमा विभक्तीत आहेत. म्हणजेच तो सूर्य ज्ञात्यापासून, माझ्यापासून भिन्न नाही. (मी) तो सहस्र म्हणजे हजारो किरणांनी युक्त आहे. त्या किरणांद्वारेच प्रत्येकाला ऊर्जा व प्रकाश मिळतो. हा शेकडो प्रकारांनी कार्य करतो. अनेक रूपे धारण करून कार्य करतो व ऋतु आदि निर्माण करण्याचे ही कार्य करतो. त्याच्यामुळेच वृष्टी होते. म्हणूनच हा सर्व प्रजांचा प्राण असलेला हा सूर्य उगवतो आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeradhuveer.com

31 March 2013

संवत्सरो वै प्रजापतिः । तस्य अयने दक्षिणं च उत्तरं च ।
तत ये ह वै तत् इष्टापूर्ते कृतम् इति उपासते ते
चान्द्रमसम् एव लोकम् अभिजयन्ते । ते एव पुनरावर्तन्ते ।
तस्मात् एते ऋषयः प्रजाकामाः दक्षिणं प्रतिपद्यन्ते ।
एषः ह वै रयिः यः पितृयाणः ॥९॥

अर्थ - संवत्सर - वर्ष - काळ हाच प्रजापति आहे. त्या प्रजापतीचे दक्षिण व उत्तर असे दोन अयन (मार्ग) आहेत. जे लोक अनित्य इष्टापूर्त कर्माचेच अनुसरण करतात, ते लोक चंद्रलोकावर जय प्राप्त करतात. ते लोक पुन्हा पुन्हा येतात व जातात. त्या दक्षिण मार्गालाच पितृयाण मार्ग असे म्हणतात. हा चंद्रलोक म्हणजेच रयि - अन्न आहे.

विवेचन - सूर्य व चंद्र ही जोडी निर्माण झाली. कालगणना सुरु झाली. सहा ऋतुंचे संवत्सर बनते. या ऋतुमुळेच वगवेगळी धान्ये, फळे, वनस्पती निर्माण होऊन प्रजेचे पोषण होते. म्हणून संवत्सराला प्रजापती म्हणतात. त्या संवत्सराचे दोन भाग. उत्तरायण व दक्षिणायन. उत्तरायण हा प्राण व दक्षिणायन हा रयि आहे. सर्व भोग घेण्यास जीव हवा, तसेच शरीर हवे. दक्षिणायनात पुनरावर्तन आहे.

या जीवनात जे इष्टापूर्त कर्मे कर्तव्य म्हणून करतात ते दक्षिणायनाने चांद्रमस लोकाला पोहोचतात. त्या चांद्रमस लोकातून ते पुन्हा पृथ्वीवर जन्म घेतात.

मनुष्य मृत्युनंतर आपापल्या कर्मानुसार गती प्राप्त करतो. जे इष्ट म्हणजे यज्ञयागादि कर्मे व पूर्त म्हणजे समाजोपयोगी कर्मे मंदिर बांधणे, धर्मशाळा पाणपोया घालणे, घाट बांधणे इ० करतात ते ऐहिकातच गुरफटलेले असतात. त्यांना खूप वरची गती मिळत नाही ते चंद्रलोकात जातात.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

उत्तरायण

अथ उत्तरेण तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया विद्यया आत्मानम् अन्विष्य आदित्यम् अभिजयन्ते। एतत् वै प्राणानाम् आयतनम् एतत् अमृतम् अभयम् एतत् परायणम् एतस्मात् न पुनरावर्तन्ते इति एष: निरोध:। तत् एष: श्लोक:॥१०॥

अर्थ - त्याप्रमाणे इंद्रिय संयमनरूप तप, ब्रह्मचर्य, श्रद्धा, विद्या (उपासना) यांच्या सहाय्याने आत्मस्वरूपाचे शोधन करून उत्तरायण मार्गाने त्या साधकाना सूर्यलोकाची प्राप्ती होते. निश्चितपणे हेच सर्व प्राणिमात्रांचे आयतन - आश्रयस्थान आहे. हेच अमृत, अभय स्वरूप आहे. तेच उपासकांसाठी श्रेष्ठ अधिष्ठान आहे. त्यापासून साधक पुन्हा कधीही जन्ममृत्यूला प्राप्त होत नाहीत म्हणून ज्ञानी लोकांसाठी हे निरोधस्थान आहे. याविषयी हा मंत्र आहे:

विवेचन - उत्तरायणाने जाणारे लोक आदित्य लोकाला पोहोचतात. ते तप करणारे, ब्रह्मचर्याचे पालन करणारे असतात. ते अध्यात्मविद्येने स्वत:चा शोध घेतात. हा आदित्य प्राणांचा आधार आहे, हा अमृत आहे. जो ब्रह्मरूप झाला त्याला कुणाचे कसले भय असणार? तो निर्भय होतो. हेच माणसाचे अंतिम गंतव्य आहे. ही स्थिती ही जन्माचा निरोध करणारी आहे म्हणून इथला माणूस पुन्हा पृथ्वीवर जन्म घेऊन परतत नाही.

हा आदित्य लोकाला पोहोचलेला शमदमाच्या मार्गाने जाणारा असतो. तो शाश्वताचा ध्यास घेतो. श्रेयसाची निवड करतो. (एकाग्र) तपाने त्याची बुद्धी सूक्ष्म होत जाते. त्याचा 'मी' पूर्णपणे गळून जातो. तो सर्व विश्वात पसरतो. तो आत्म्याला शोधून काढतो. आदित्य लोकात जातो. आदित्याची चकती बाजूला केली की ब्रह्मदर्शन होऊ शकते.

© www.madhaveeramhuveer.com

पञ्चपादं पितरं द्वादशाकृतिं दिव आहु: परे अर्धे पुरीषिणम्। अथ इमे अन्ये उ परे विचक्षणं सप्तचक्रे षडर आहु:अर्पितम् इति।

अर्थ - जो आकाशाच्या - अंतरिक्षाच्या पलीकडे असणारा संवत्सर आहे, तो पायाने युक्त असून त्याला पाच पाय व बारा अवयव आहेत आणि तो सर्वांचा पिता आहे, असे विद्वान लोक म्हणतात. अन्य काही लोक म्हणतात की तो सर्वज्ञ असून सात चाकांनी व सहा आऱ्यांनी युक्त आहे.

विवेचन - या संवत्सररूप आदित्याला पाच चरण आहेत. सूर्यामुळे ऋतु होतात. वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद आणि हेमंत व शिशिर (मिळून) एक असे पाच ऋतु म्हणजे त्याचे पाय आहेत. कारण ऋतुरूपी चरणांनीच तो पुढे पुढे सरकत असतो. त्याचे बारा महिने म्हणजे बारा अवयव आहेत. या द्वादश मासांनी युक्त असे त्याचे शरीर आहे. त्याच्यामुळेच सर्व विश्व निर्माण झाले म्हणून तो सर्वांचा जनक आहे. तो दिव म्हणजे स्वर्गाच्या पलीकडे राहतो. तो जलाचे पुरीष जल आहे. पुढील अर्ध्या भागात द्युलोकाच्या पुढील अर्ध्या भागात ओभरत भरून राहिले आहे. त्यामुळे तो वृष्टि करतो. स्मृति म्हणते - आदित्यात् जायते वृष्टि:। दुसरे काहीजण म्हणतात - हा सूर्य अत्यंत विचक्षण म्हणजे सर्व काही जाणणारा आहे. याला सात चक्र आहेत. सात दिवसांचे सात घोडे याच्या रथाला आहेत. या चक्रांना सहा ऋतूंचे सहा आरे आहेत. ते याच्यातच अर्पित, खोचलेले आहेत. स्थूल रूपात दिसणारे सूर्यमंडल त्यात आदित्यनारायण राहतो. त्याचा हा रथ आहे. तो महान आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

मासो वै प्रजापति: तस्य कृष्णपक्ष एव रयि: शुक्ल: प्राण:।
तस्मात् एते ऋषय: शुक्ले इष्टं कुर्वन्ति इतरे इतरस्मिन् ॥१२

अर्थ - मास हाच पूर्वोक्त प्रजापति आहे. त्यामधील कृष्णपक्ष हे रयि असून शुक्लपक्ष हा प्राण आहे. म्हणून प्राणाची उपासना करणारे ऋषी शुक्लपक्षामध्ये यज्ञ करतात आणि दुसरे (कर्मठ) ऋषी कृष्णपक्षामध्ये यज्ञयागादि कर्मे करतात.

विवेचन - संवत्सर म्हणजे प्रजापती आहे. त्याचे उत्तरायण व दक्षिणायन हे मिथुन आहे. आता या मंत्रात मासाला प्रजापती म्हटले आहे. व शुक्ल आणि कृष्णपक्ष हे त्याचे मिथुन आहे. जसे गंगेच्या जलाच्या एका लहानशा थेंबात सुद्धा गंगेचे पावित्र्य (गंगापण) असते, तसेच प्रजापतीच्या अवयवांमध्येही प्रजापतित्व येते. म्हणून इथे मासाला सुद्धा प्रजापति म्हटले आहे. यातील कृष्णपक्ष हा रयि आहे तर शुक्ल पक्ष हा प्राण आहे. कृष्ण पक्षात चंद्र लहान होत जातो. तर शुक्ल पक्षात वृद्धिंगत होत जातो.

म्हणून (तस्मात्) हे मोक्ष प्राप्त करू इच्छिणारे, ब्रह्मरूप होऊ पहाणारे ऋषी तेजस्वी सूर्याशी स्वतःला जोडू पहातात. त्या सूर्याच्या पलीकडे ब्रह्मदर्शन होणार असते. म्हणून सूर्याशी जोडले जाणे महत्वाचे. पण स्वर्गाची इच्छा करणारे सकाम यज्ञ करतात. त्यांना भोगाची भले ही ते स्वर्गभोग असोत - इच्छा असते ते कृष्णपक्षात - जो रयि म्हणजे अन्न म्हणजे भोगाचा पक्ष आहे त्या पक्षात यज्ञयाग करतात. हे कर्मठ लोक प्राणाला पहात नाहीत. त्यांचे अंतःकरण कामुक, अशुद्ध असल्याने त्यांनी एखादे कर्म शुक्लपक्षात शुभदिवस पाहून केले तरी ते कृष्णपक्षात केल्या प्रमाणेच होते. ह्या दोन प्रवृत्ती आहेत, तेजाशी एकरूप होणे ही एक आणि विविध भोग घेणे ही दुसरी।

Birthday / Anniversary

8 am अहोरात्रौ वै प्रजापातिः। तस्य आहः एव प्राणः। रात्रिः एव रायिः।
प्राणं वा एते प्रस्कन्दानि ये दिवा रत्या संयुज्यन्ते।
9 ब्रह्मचर्यम् एव तद् यद् रात्रौ रत्या संयुज्यन्ते॥१३॥

10 अर्थ- निश्चितच दिवस-रात्र म्हणजे प्रजापती आहे. त्यामध्ये दिवस हा प्राण असुन रात्र हे रयि आहे. जे लोक दिवसा
11 रतिबरोबर संयुक्त होतात ते निश्चितच प्राणांची हानी करतात. तसेच जे रात्री रतिबरोबर संयुक्त होतात त्यांचे ब्रह्मचर्यच आहे.
12

1 pm विवेचन- काळाचा हा आणखी एक महान भाग. संवत्सर, अयन, मास व आता दिवस-रात्र मिळून संपूर्ण दिवस. हाच जणू प्रजापती आहे. यात तेजोमय दिवस हा 'प्राण' आहे आणि रात्री 'रयि' आहे. जो दिवसा स्त्रीशी रत होतो तो क्षीण होतो. दिवसा प्राणशक्ती अधिक असते. ते तेज वीर्यपतनाबरोबर जाते. वीर्य हे सर्वात तेजस्वी असे मनुष्याचे सार आहे. जे रात्री ऋतुकालात, पवित्र दिवस वर्ज्य करून (प्रजाप्राप्तीसाठी) स्त्रीशी संबंध ठेवतात व ब्रह्मचर्यव्रताचेच पालन करतात. ऋतौ भार्याम् उपयात।
भोग हा संयमित हवा. त्यामुळे शक्तिपात न होता तेजोवृद्धी होते. विषयसेवन मर्यादित असावे. विषयांच्या आहारी जाऊ नये.

7

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com

अन्नं वै प्रजापतिस्ततो ह वै तद्रेतस्मादिमाः
प्रजाः प्रजायन्त इति ॥ १४॥

<u>अर्थ</u> - अन्न हेच प्रजापति आहे. अन्न हेच रेत आहे. त्या रेतापासूनच ही सर्व प्रजा निर्माण होते.

<u>विवेचन</u> - अन्न म्हणजे काय? भात, वरण, भाजी-पोळी म्हणजे अन्न नाही तर अन्न म्हणजे जे खाऊन पुष्ट करते ते। या विश्वातील प्रत्येक गोष्ट ही अन्न आहे व अन्नादः म्हणजे खाणारी, भोग घेणारी ही आहे. गवत हे बकरीचे अन्न आहे, तिला खाणारा वाघ आहे. मृत्यु तर सर्वांना क्षणाक्षणाला खात असतो. अन्न म्हणजे जीवन देणारे, पुष्ट करणारे, प्रजेचे पालनपोषण करणारे आहे. ते अन्न खाऊनच माणसाच्या देहाचे सार असे वीर्य तयार होते. तसेच स्त्रीमध्ये रजस तयार होते. या दोन्हीच्या संयोगाने प्रजोत्पत्ती होते. पुरुषामधील नृबीज हे प्रजेचे कारण आहे. जेव्हा ते शुक्रबीज स्त्रीच्या योनीमध्ये सिंचन केले जाते तेव्हा त्या दोन बीजांच्या संयोगातून मनुष्यरूपादि लक्षणांनी युक्त अशी प्रजा निर्माण होते.

अशा रितीने सूर्य व चंद्र या प्रथम मिथुनापासून क्रमाक्रमाने सर्व प्रजा निर्माण झाल्या. कबंधीच्या प्रजोत्पत्तीसंबधी प्रश्नाचे उत्तर देऊन झाले हे दर्शविण्यासाठी 'इति' हा शब्द आला आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

तद्ये ह वै तत्प्रजापतिव्रतं चरन्ति ते मिथुनमुत्पादयन्ते। तेषामेवैष ब्रह्मलोको येषां तपो ब्रह्मचर्यं येषु सत्यं प्रतिष्ठितम्॥१५॥

अर्थ- याप्रकारे जे लोक प्रजापतिव्रताचे आचरण करतात ते मिथुनाची निर्मिती करतात. ज्यामध्ये तप, ब्रह्मचर्य व सत्य प्रतिष्ठित आहे असा ब्रह्मलोक त्यांनाच प्राप्त होतो.

विवेचन - या मंत्रात फलश्रुती सांगितली आहे. गृहस्थाश्रमी पुरुषाने फक्त ऋतुकाळी रात्रीच्या वेळी स्त्रीगमन करणे याला प्रजापतिव्रत असे म्हणतात. असे व्रतपालन करणाऱ्यांना पुत्ररत्न किंवा कन्यारत्नाची प्राप्ती होऊन असानंद मिळतो. ते वंशाचे व पर्यायाने समाजाचे सातत्य टिकवतात. हे त्यांना मिळणारे दृश्य फल आहे. तसेच याव्यतिरिक्त इष्ट, पूर्त आणि दानादि कर्म करणाऱ्या पुरुषांना ब्रह्मलोक हे अदृश्य फळ प्राप्त होते. त्यांना चंद्रलोक प्राप्त होतो. आपले पुण्य संपेपर्यंत ते तिथे राहतात व पुन्हा पृथ्वीवर येतात.

© www.madhuraveeraghuveer.com

15 MON
MAR
2010
Wk 11, 074-291

Priority

**March 2010**

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

8 am तेषामसौ विरजो ब्रह्मलोको न येषु
जिह्ममनृतं न माया चेति ॥१६॥

9 **अर्थ** - ज्या लोकांच्या अंतःकरणामध्ये कुटिलता नाही.
10 असत्य नाही आणि माया नाही (कपट नाही) त्यांनाच
हा विशुद्ध ब्रह्मलोक प्राप्त होतो.

11 **विवेचन** - गृहस्थाश्रमी लोकांपेक्षा या मंत्रामध्ये सांगितलेले
12 श्रेष्ठ उपासक हे भिन्न आहेत. अशा श्रेष्ठ उपासकांना
विशुद्ध ब्रह्मलोक प्राप्त होतो. जेथे कुटिलता नाही
1 pm खोटेपणा नाही, माया (कपट) नाही. असा हा शुद्ध
ब्रह्मलोक आहे- हा गृहस्थाश्रमी पुरुषांना प्राप्त होणे
2 शक्य नाही. कारण गृहस्थाश्रमात व्यवहार येतो आणि
व्यवहारात थोडी तरी कुटिलता येते. काही वेळा थोडे
3 तरी खोटे बोलले जाते. थोडा दांभिकपणा (माया) असतो.
त्यामुळे गृहस्थाश्रमी माणसामध्ये काही प्रमाणात हे दोष
4 असतातच. मात्र हे तीनही दोष ज्यांच्यात नाहीत असे
अधिकारी फक्त ब्रह्मचारी, वानप्रस्थाश्रमी किंवा संन्यासी
5 पुरुषच असू शकतील. अशा शुद्ध अंतःकरणाच्या अधिकारी
साधकांना उत्तरायण मार्गाने हा विशुद्ध सूर्यलोक, ब्रह्मलोक
6 प्राप्त होतो. त्यांना क्रममुक्ती मिळते. ब्रह्मलोकाच्याही पलीकडे
असणारे ब्रह्मपद- तिथपर्यंत पोहोचणे हे त्यांचे ध्येय असते.

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

2 April 2013

## द्वितीय खण्डः

अथ ह एनं भार्गवः वैदर्भिः पप्रच्छ। भगवन् कति एव देवाः प्रजां विधारयन्ते? कतरे एतत् प्रकाशयन्ते? कः पुनः एषां वरिष्ठः? इति ॥१॥

अर्थ - नंतर विदर्भातून आलेल्या भार्गवाने (पुढे येऊन) प्रश्न विचारला - "भगवन् (या प्रजा निर्माण झाल्या पण) या प्रजांना किती देव धारण करतात? त्यांना कोण कोण प्रकाशित करतात? आणि पुन्हा या सर्व देवतांत (इंद्रियांत) श्रेष्ठ कोण आहे?

विवेचन - इथे देवता म्हणजे इंद्रिये आहेत. द्योतनात्मक इति देवः। जो प्रकाशमान करतो तो देव. शरीरामधील सर्व इंद्रिये बाह्य विश्व व विषय यांना प्रकाशित करतात. प्रत्येक इंद्रियाचे कार्य व महिमा स्वतंत्र आहे. शरीरामध्ये पाच ज्ञानेंद्रिये व पाच कर्मेंद्रिये आहेत. याप्रमाणे या देवतांचे दोन विभाग होतात. ही इंद्रिये कार्यकरणलक्षणांनी युक्त आहेत. अन्य मतानुसार विश्वात विविध शक्ती काम करतात. त्या शक्ती देवता आपल्या इंद्रियांना शक्ती देतात व त्यांच्यावर सत्ता गाजवतात. त्यांचे नियमन करतात.

17 WED MAR 2010

Wk 11, 076-289

Priority

२,३,४, मंत्र

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

March 2010

8 am तस्मै स ह उवाच आकाशो ह वै एष: देव:
वायु: अग्नि: आप: पृथिवी वाङ् मन: चक्षु: श्रोत्रं च।
9 ते प्रकाश्य अभिवदन्ति, वयम् एतत् बाणम् अवष्टभ्य
विधारयाम: ॥ २॥

10 अर्थ - त्या भार्गवाला पिप्पलाद मुनी निश्चितपणे म्हणाले
11 की आकाश हाच निश्चितपणे देव आहे. वायु, अग्नि
जल, पृथ्वी, वाणी, मन, नेत्र, कर्ण हे सर्वजण (प्रजारूप
12 शरीराला) प्रकाशित करून म्हणतात की आम्ही या
शरीराला आश्रय करून देऊन विशेषत्वाने धारण करतो.

1 pm विवेचन - इथे वाणी या शब्दातून वाक् - पाणी - पाद - पायु
2 आणि उपस्थ ही पंचकर्मेंद्रिये सूचित केली आहेत तर
श्रोत्र या शब्दातून कर्ण - त्वचा - चक्षु - जिव्हा - घ्राणेंद्रिय
3 ही पंचज्ञानेंद्रिये सूचित केली आहेत. तर मन या
शब्दामधून अंत:करण म्हणजे मन - बुद्धी - चित्त - अहंकार
4 हे चतुष्टय सूचित केले आहे.
म्हणजेच पंचमहाभूते, अंत:करण, पंचज्ञानेंद्रिये व
5 पंचकर्मेंद्रिये हे जणू काही देव असून तेच शरीराला
धारण करतात. ती सर्व इंद्रिये स्वत:च श्रेष्ठत्व व
6 महात्म्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात.
तेव्हा ही सर्व इंद्रिये एकमेकांशी स्पर्धा करतात व
7 आपापल्या विषयांना प्रकाशमान करून स्वत:चे माहात्म्य
सांगतात. त्यामुळेच हा संघात असितत्वात आहे. मीच
या शरीराला विशेषत्वाने धारण केले आहे. मीच या
शरीराला आधार देतो. (प्रासाद इव स्तम्भादय:)
जसे शांततेने प्रासादाचे रक्षण करीत खांब प्रासादाला
धारण करतात त्याप्रमाणेच आम्ही या शरीराला धारण केले
Birthday / Anniversary आहे. प्रत्येक खांबाचा असा समज असतो की मी आहे

© www.madhaveeraghuveer.com

| April 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

*Priority*

THU MAR 18 2010

Wk 11, 077-288

8 am म्हणून प्रासाद आहे. मी जर बाजूला झालो तर प्रासाद कोसळेल.
शरीर प्राणवान आहे हे इंद्रियांच्या व्यापारावरून
9 कार्यावरून कळते म्हणजे प्रकाशीत होते. प्रत्येक इंद्रिय
महत्वपूर्ण कार्य करीत असते. त्यामुळे त्यांना फार गर्व
10 झाला. प्रत्येकालाच वाटू लागले की माझ्यामुळेच शरीर
चालते. या शरीरात खरे महत्व कुणाचे असेल तर मासेचा

11

12

1 pm

2

3

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

8 am तान् वरिष्ठः प्राणः उवाच
"मा मोहम् आपद्यथ । अहमेव एतद् पञ्चधा आत्मानं
9 प्रविभज्य एतद् बाणम् अवष्टभ्य विधारयामि" इति ।
ते अश्रद्दधाना: बभूवुः ॥३॥

10

अर्थ - त्या सर्व इंद्रियांना मुख्य प्राण म्हणाला की तुम्ही
11 मोहवश होऊ नका. मीच स्वतःला पाच भागात विभागून
या शरीराला आश्रय देऊन धारण करतो. परंतु त्या
12 देवतांनी यावर विश्वास ठेवला नाही.

1 pm विवेचन - परस्परांमध्ये स्वतःच्या श्रेष्ठत्वासंबंधी वाद करणाऱ्या
इंद्रियांना मुख्य प्राण सांगतो की तुम्ही भ्रमात राहू नका.
2 कारण या शरीराला माझाच आधार आहे. तुम्ही उगीच
अविवेकाने अभिमान धरू नका. तुमच्यापैकी कुणीही हे
3 शरीर धारण करत नाही. मीच स्वतःला पाच भागात
विभागून घेतो आणि हे शरीररूपी वस्त्र स्थिर ठेवून
4 धारण करतो.
व्यान - शरीराच्या सर्व भागात राहून देहाचे सर्व सांधे
5 मागेपुढे हलवण्याचे कार्य करतो.
समान - नाभिस्थानात रहातो. तो अन्नाचे पचन करून
6 त्याचे तीन भाग करून योग्य ठिकाणी पोहोचवण्याचे काम करतो.
उदान - कंठस्थानात रहातो. अन्न व जलाला जठरात पोहोचवतो
7 व कंठातील हिता नाडीच्या योगाने स्वप्न व उचकी निर्माण करतो.
प्राण - हृदयस्थानात राहतो. दिवस-रात्र मिळून २४ तासात
२१,६०० वेळा श्वासोच्छ्वास करून प्राणवायूचा पुरवठा करतो.
अपान - गुदस्थानात राहून मलविसर्जनाचे काम करतो.
याशिवाय आणखी पाच उपप्राण आहेत.
० नाग - ढेकर देणे
Birthday / Anniversary ० कूर्म - डोळ्यांची उघडझाप करणे.

© www.madhaveeraghuveer.com

8 am
- कृकल - शिंकू येणे
- देवदत्त - जांभई येणे

9
- धनंजय - सर्व शरीरात राहून शरीर पुष्ट करणे (हा मेल्यानंतर प्रेताला फुगवतो)

10
हे प्राणाचे बोलणे ऐकून इतर इंद्रियांनी त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. कारण प्राणाची अनुपस्थिती त्यांनी
11
कधी अनुभवली नव्हती. प्राण हा नित्य शरीरामध्ये असतोच अन्य इंद्रियांचे व्यापार गाढ सुषुप्तीमध्ये लय पावले तरी
12
त्याही अवस्थेत शरीरामधील प्राण हा कार्यरत असतोच.

खरे तर प्राणाच्या अस्तित्वामुळेच इंद्रियांचे व्यापार
1 pm
चालतात परंतु इंद्रिये व इंद्रियांचे व्यापार डोळ्यांना दिसतात म्हणून इंद्रिये प्रबळ होतात. त्यामागील प्राण मात्र
2
दिसत नाही. प्राण नसेल तर काय होईल याचा अनुभव इंद्रियांना नसल्यामुळे त्यांनी प्राणाच्या वाक्यावर विश्वास ठेवला नाही. त्यांना हा प्राणाचा गैरसमज वाटला.

3
4
5
6
7

Birthday / Anniversary

© www.madhavveeraghuveer.com

सः अभिमानात् ऊर्ध्वम् उत्क्रमते इव तस्मिन् उत्क्रामति अथ इतरे सर्वे उत्क्रामन्ते, तस्मिन् च प्रतिष्ठमाने सर्वे एव प्रतिष्ठन्ते। तत् यथा मक्षिकाः मधुकरराजानम् उत्क्रामन्तं सर्वाः एव उत्क्रामन्ते तस्मिन् च प्रतिष्ठमाने सर्वाः एव प्रातिष्ठन्ते, एवं वाक् मनः चक्षुः श्रोत्रं च ते प्रीताः प्राणं स्तुन्वन्ति ॥४॥

अर्थ - तो प्राण अभिमानपूर्वक जणू काही शरीराच्या वर जाऊ लागला तेव्हा प्राण वर जाऊ लागताच सर्वजण बाहेर जाऊ लागले. तो पुन्हा शरीरात प्रतिष्ठित झाल्यावर सर्वजण पुन्हा प्रतिष्ठित झाले. जसे मुख्य माशी मधाच्या पोळ्यामधून बाहेर जायला लागल्यावर अन्य माशाही पोळे सोडतात. व ती माशी पुन्हा पोळ्यामध्ये बसल्यावर अन्य माशाही पोळ्यामध्ये स्थिर होतात. याप्रमाणे वाणी, मन, चक्षु, श्रोत्रादि सर्व इंद्रिये प्रसन्न होऊन प्राणांची स्तुति करु लागली.

विवेचन - इंद्रियांनी प्राणांवर विश्वास ठेवला नाही. इंद्रियांचा अविश्वास, अश्रद्धा प्राणाने पाहिली व तो अभिमानपूर्वक जणू काही शरीराच्या बाहेर जाऊ लागला.

येथे अभिमान म्हणजे अहंकार नाही. तर प्राणाने स्वतःबद्दल आदर निर्माण केला. हा प्राणाचा क्रोध किंवा बाहेर निघून जाणे हे वास्तविक नसून त्याने केवळ नाटक केले. हे दाखवण्यासाठी 'इव' हा वैशिष्ट्यपूर्ण शब्द योजला आहे. प्राणाचा क्रोध हा निरपेक्ष आहे. त्यात अपेक्षा, विकार वासना नाहीत, द्वेष नाही. तर प्राणाची एकच इच्छा आहे ती म्हणजे सर्व इंद्रियांना सत्य वस्तुस्थिती समजावून देऊन त्यांचा वृथाभिमान नष्ट करणे यासाठी प्राणाने बाहेर जाण्याची फुसती झलक दाखवली.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

8 am ज्याक्षणी प्राण बाहेर जाऊ लागला त्याचक्षणी इंद्रियांची शक्ती
सुद्धा बाहेर पडू लागली. सर्व इंद्रिये निस्तेज, चेतनाहीन
9 दिसू लागली. प्राणांनी शरीरात प्रवेश केल्याबरोबर पुन्हा
इंद्रियांमध्ये कार्यशक्ती चेतना प्राप्त झाली.

10 येथे मधमाशांचा दृष्टांत दिला आहे. सर्व इंद्रियांना
मनोमन पटले की आपल्यामधील एखादे इंद्रिय नसले
11 तरी शरीराचे कार्य सुरळीत चालू शकते पण प्राण
नसेल तर सर्व क्रिया बंद पडतात. त्यामुळे त्यांना प्राणाचे
12 महत्त्व समजले व त्यांनी प्राणाची मनापासून स्तुती केली.
श्रेष्ठांची स्तुती केली म्हणजे त्यांची कृपा लाभते व आपणास
1 pm पुष्टि, तुष्टि प्राप्त होते.

2

3

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

गीता- १५.१४ अहं वैश्वानरो भूत्वा- - -

एष: अग्नि: तपति एष: सूर्य: एष: पर्जन्य: (एष) मघवान्, एष: वायु: । एष: पृथिवी (एवं) रयिर्देव: सदसच्चामृतं च यत् (स: एष: प्राण:) ॥५॥

अर्थ- हा प्राण अग्निस्वरूपाने तप्त होतो, तोच सूर्यरूपाने प्रकाशमान होतो. तोच पर्जन्य, इंद्र, वायु पृथ्वी, रयि असून तोच देव आहे. तोच सत् असत् व अमृत- स्वरूप आहे. (गीता- ९.१९) तपाम्यहमहम्- - -

विवेचन- हा प्राण अग्निरूपाने तापतो म्हणजे अग्नीतील दाहकता व उष्णता हे प्राणाचे स्वरूप आहे. तोच प्राण सूर्यरूप होऊन चराचर सृष्टीला प्रकाशमान करतो. तोच प्राण मेघरूपाने पर्जन्यवृष्टी करतो व अन्नधान्याची निर्मिती करतो. प्राण इंद्रस्वरूप होऊन प्रजेचे पालन करतो. तोच प्राण वायुच्या भेदांनी (आवह, प्रवह) युक्त आहे. तोच प्राण पृथ्वी असून तोच रयि म्हणजेच अन्न तोच चंद्रमा आहे. तोच देव म्हणजे सर्वांना प्रकाशमान करणारा आहे. तोच प्राण चंद्रमा होऊन वनस्पतींमध्ये रस निर्माण करतो. तोच विश्वाचे पालन पोषण, वर्धन करतो. तोच मूर्त- व्यक्त, स्थूल, दृश्य आहे आणि तोच अमूर्त- अव्यक्त, सूक्ष्म, अदृश्य आहे. तोच प्राण अमृत म्हणजेच देवांच्या स्थितीला कारण आहे. प्राण सर्वांचे आश्रयस्थान आहे.

हा प्राण व्यष्टिरूपात शरीरात उब निर्माण करतो तर समष्टिरूपात सूर्य होऊन विश्वाला जीवनावश्यक उब देतो. व्यष्टिरूपात याच्यामुळे रक्ताभिसरण होते तर समष्टिरूपात याच्यामुळे मेघ निर्माण होतात व पाऊस पडतो. बलवान इंद्र होऊन हा सर्व अडथळे दूर करण्याचे कार्य शरीरात व ब्रह्मांडात करतो. शरीरात वायु बनून श्वासोच्छ्वास करतो तर ब्रह्मांडात वायुरूपाने

| April 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

*Priority*

WED
MAR
2010
24

Wk 12, 083-282

8 am संचार करून विश्वाला जिवंत - हालचालीयुक्त ठेवतो
हा. प्राणच भोक्ताही आहे आणि भोज्यही आहे. अन्नाही
9 आहे आणि अन्नही आहे. मूर्त - अमूर्त, सत - असत प्राणच
आहे. प्राणामुळेच हे शरीर आणि सूर्यामुळेच विश्व आहे.
10 परब्रह्म - सत - चित - आनंदरूप परमात्माच अशा तऱ्हेने
समष्टीत व व्यष्टीत, ब्रह्मांडात व पिंडात सर्वरूपे धारण
11 करून राहतो. प्रत्येक वस्तूत त्याचे गुण भरून राहिले आहेत.
श्री गणपती अथर्वशीर्षातही त्याचीच स्तुती गायली आहे.
12 त्वं ब्रह्मा त्वं विष्णुस्त्वं रुद्रस्त्वमग्निस्त्वंवायुस्त्वं सूर्यस्त्वं
चन्द्रमास्त्वं ब्रह्मभूर्भुव: स्वरोम्
1 pm तूच ब्रह्मा - विष्णु - रुद्र - अग्नि - वायु - सूर्य - चंद्रमा - ब्रह्म -
भू - भुव: - स्व: आणि ओंकारस्वरूप आहेस.

2

3

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeragruweer.com

4 April 2013

अरा इव रथनाभौ प्राणे सर्वम् प्रतिष्ठितम्।
ऋचो यजूंषि सामानि यज्ञः क्षत्रं ब्रह्म च॥६॥

अर्थ- ज्याप्रमाणे रथाच्या नाभीमध्ये सर्व आरे रहातात, त्याप्रमाणेच प्राणामध्ये ऋक्-यजु-साम (मंत्र) तसेच यज्ञ, ब्राह्मण व क्षत्रिय सर्वजण स्थित आहेत.

विवेचन- रथचक्राच्या तुंब्यामध्ये ज्याप्रमाणे सर्व आरे आधारलेले असतात त्याप्रमाणे प्राणाच्या आधारानेच सारा विस्तार झाला आहे. ऋग्वेदातील ऋचा, सामवेदातील साम आणि यजुर्वेदातील यजुर्मंत्र त्याच्या आश्रयानेच झाले आहेत. त्याचा उपयोग करून होणारा यज्ञ, तो करणारे ब्राह्मण, क्षत्रिय आदि सर्व प्राणांवरच आधारित आहेत. प्राण आहे म्हणून ऋचा स्फुरतात, साम गायले जातात, हातांनी पवित्र कार्य होते.

रथचक्राचे आरे नाभीभोवती फिरतात परंतु नाभि मात्र स्थिर असते, त्याप्रमाणे जे जे काही वर्तमानकाळामध्ये आहे ते सर्व प्राणामध्ये प्रतिष्ठित आहे. प्राणच या सर्वांचा आधार आहे. भोक्ता - भोग्य - भोग या सर्वांना प्राणाचाच आधार आहे.

©www.madhaveeraghuveer.com

Birthday / Anniversary

प्रजापतिश्चरसि गर्भे त्वमेव प्रतिजायसे। तुभ्यं प्राण प्रजास्त्विमाः बलिं हरन्ति यः प्राणैः प्रतितिष्ठसि॥ ७॥

अर्थ - हे प्राण! तूच प्रजापति आहेस. तूच गर्भामध्ये संचार करतोस. ही सर्व प्रजा तुला सर्व काही समर्पित करते, कारण तू चक्षुरादि इंद्रियांसह त्यांच्यामध्ये सन्निविष्ट आहेस.

विवेचन - उपनिषदातील तत्त्वांप्रमाणे जीव प्रथम आपल्या रहाण्यासाठी घर निर्माण करतो. त्याप्रमाणे विश्वात सर्वप्रथम लोकांची निर्मिती झाली. मग त्यात 'विराट' प्रकट झाला. त्याप्रमाणे पहिले पाच महिने गर्भाशयात देहाची वाढ होत असते व सहाव्या महिन्यात त्यात प्राणांचा संचार होतो. त्यामुळे गर्भधारणेनंतर तूच गर्भात प्रवेश करतोस व भ्रूण होतो त्याच तू जिवंत बालक बनवतोस. वडिलांच्या रूपाने तूच होतास व त्यांचाच अंश बनून तू पुन्हा पुत्ररूपाने जन्म घेतोस. पुत्राला पित्याचा आत्माच मानला आहे. सर्व शरीरधाऱ्यांत तूच भरून आहेस.

प्रतिजायसे याचा एक अर्थ असा आहे की पित्याप्रमाणे पुत्र होतो. माणसाचा पुत्र माणूस, सशाचा ससाच, हत्तीचा हत्तीच होतो. त्याच जातीच्या पुत्राला जन्म दिला जातो.

या शरीरात जी भिन्न भिन्न इंद्रिये आहेत ती आपापला करभार तुलाच अर्पण करतात. प्रजा ज्याप्रमाणे स्वतः मिळवलेले कमावलेले धन राजाला अर्पण करते त्याप्रमाणे डोळे जे दृश्य पहातात ते प्राणांना अर्पण करतात. कान, नाक ~~जीभ~~ जो आस्वाद घेतात ते प्राणांना पोहोचवतात. इंद्रिये त्यांनी आणलेल्या भोगांचा आस्वाद घेऊ शकत नाहीत भोग प्राण घेतो. म्हणून चांगली गोष्ट (खाण्या पिण्याची बघण्याची) मिळाली की जीव सुखावला असे म्हणतो. तसेच चित्त थाऱ्यावर नसेल तर डोळ्यांनी



© www.madhaveeragni.com

27 SAT MAR 2010

Wk 12, 086-279

Priority

यस्य नास्ति विवेकस्तु केवलं यो बहुश्रुतः।
न स जानाति शास्त्रार्थान् दर्वी पाकरसानिव॥

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

March 2010

पाहूनसुद्धा अर्थबोध होत नाही.

कारण त्या इंद्रियांना स्वतःची बुद्धी नसते हा प्राणच देहा ठिकाणी असलेले विभाजन करून त्या त्या इंद्रियांकडून ते ते काम करून घेतो. आपण चमच्याने काही खात असतो तेव्हा चमच्याला स्वादही कळत नाही किंवा आनंदही होत नाही. इंद्रिये ही उपकरणे आहेत.

प्राणाचे श्रेष्ठत्व इंद्रियांनी मान्य केल्यामुळे सर्व इंद्रिये जणू प्राणाची पूजा करून त्यास सर्व अर्पण करतात. सर्व विषयांचे ग्रहण केलेले ज्ञान, संवेदना अर्पण करतात. कारण 'प्राण' हाच या विश्वामध्ये एकच भोक्ता आहे. अन्य सर्व भोग्य आहे. म्हणून सर्व गोष्टी प्राणाला अर्पण करणेच योग्य!

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

देवानामसि वह्नितम: पितृणां प्रथमा स्वधा।
ऋषीणां चरितं सत्यमथर्वाङ्गिरसामसि ॥ ८॥

अर्थ - हे प्राणा! तूच देवतांच्यासाठी श्रेष्ठ अग्नि आहेस. तूच पितरांना दिल्या जाणाऱ्या आहुतीमधील प्रथम स्वधा आहेस. तूच चक्षुरादि इंद्रियांचे व अंगिरस अथर्वणाचे सत्य चरित्र आहेस.

विवेचन - हे प्राणा! सर्व देवतांसाठी तूच श्रेष्ठ अग्नि होतोस. यज्ञ, याग, इष्टि वगैरे काहीही धर्मकृत्य करावयाचे झाल्यास आधी नांदीश्राद्ध करतात. पितरांना जे अर्पण करतात त्याला स्वधा म्हणतात. ती वाहून नेण्याचे कार्य हा अग्नीच करतो. देवांना आहुती पोहोचवणाऱ्या अग्नीला आहवनीय अग्नी किंवा हव्यवाहन म्हटले जाते. पितरांना स्वधा पोहोचवणारा दक्षिणाग्नी आहे. देवतांना व पितरांना प्रसन्न करणारा प्राणच आहे.

ऋषि हा ज्ञानार्थक शब्द आहे. म्हणून जो जाणतो तो ऋषी असे म्हटले आहे. इंद्रिये त्यांच्या विषयापर्यंत जाऊन ज्ञान मिळवतात म्हणून इथे त्यांना ऋषी म्हटले आहे.

इथे अथर्व अंगिरस म्हणजे प्राण आहेत. अंगिरस म्हणजे इंद्रियांची शक्ती आणि इंद्रियांची शक्ती म्हणजे प्राण आहे. प्राण असेल तरच इंद्रिये शक्तियुक्त असतात. प्राणाचा अभाव झाला तर इंद्रिये रसहीन, शुष्क, निस्तेज होतात.

सर्व देहाचे जे सार-रस-ते प्राण जेव्हा सुस्थिर-अथर्व असतात त्यावेळी खरोखरच प्राणांमुळेच सर्व इंद्रिये टवटवीत दिसतात. डीहायड्रेशन झाले किंवा रक्तदाब खाली आला की इंद्रिये शिथिल पडतात हा अनुभव आहे. इंद्रियांचे सर्व व्यवहार शुद्ध सात्विक, चारित्र्यसंपन्न, पवित्र असावेत. सत्य आचरण हे प्राणाचेच स्वरूप आहे.



© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

March 2010

इन्द्रस्त्वं प्राण तेजसा रुद्रोऽसि परिरक्षिता।
त्वमन्तरिक्षे चरसि सूर्यस्त्वं ज्योतिषां पतिः॥९॥

अर्थ- हे प्राणा! तू इंद्र- परमेश्वर आहेस तू तेजाने रुद्र आहेस, तूच सर्वप्रकारे रक्षणकर्ता आहेस. तू अंतरिक्षामध्ये संचार करतोस. तूच सर्व प्रकाशकांचा अधिपती आहेस.

विवेचन- हे प्राणा! तूच इंद्र आहेस. इथे देवांचा राजा इंद्र हा अर्थ नसून प्राणाचे ईश्वरत्व सूचित केले आहे. तू ईशनशील - नियामक असून तू सर्वशक्तिमान - सर्वव्यापी आहेस. तेजरूपाने तूच संहारकर्ता आहेस. तूच आमचा रक्षणकर्ता आहेस. सौम्य अशा विष्णुरूपाने वर्तमानकाळात तू सर्वांचे रक्षण करतोस. उत्पत्ति - स्थिति - लय करणारा अर्थात ब्रह्मा - विष्णु - महेश तूच आहेस. तूच अंतरिक्षामध्ये सूर्यरूपाने उदय व अस्त पावून सतत भ्रमण करत असतोस. या प्राणामुळेच अंतरिक्षातील व भूमिवरील जीवन चालते, समृद्ध होते.

© www.madhaveeraghuveer.com

Birthday / Anniversary

| April 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

Priority

5 April 2013

TUE MAR 30 2010

Wk 13, 089-276

8 am यदा त्वमभिवर्षस्यथेमाः प्राणते प्रजाः।
आनन्दरूपास्तिष्ठन्ति कामायान्नं भविष्यतीति॥१०॥

9 अर्थ- हे प्राणा! जेव्हा तू (मेघरूप होऊन) वर्षाव करतोस
10 तेव्हा ही सर्व प्रजा व्यापार करू लागते. आता आपल्याला
मनासारखे अन्नधान्य प्राप्त होईल असा विचार करून
11 आनंदी होते.

12 विवेचन- इथे प्राणते - म्हणजे श्वास घेते हा एक अर्थ तर
प्राण ते प्रजाः - हे प्राणा, ही तुझी प्रजा आहे हा दुसरा
1 pm अर्थ आहे. सूर्याच्या उष्णतेने पाण्याची वाफ होऊन वर
जाते. त्याचे मेघ होतात व वर्षा होते. म्हणून प्राणांना
2 सूर्य म्हटल्यावर वृष्टी करणारा ही तोच. जेव्हा तू पाऊस
पाडतोस तेव्हा आता आपल्याला भरपूर, जेवढे हवे तेवढे
3 अन्न खाण्यासाठी मिळेल असा विचार करून तुझी ही प्रजा
अत्यंत आनंदित होते. सूर्याला जगताचा प्राण म्हटले आहे.
4 त्याच्यामुळे पाऊस पडून सर्व चेतन अचेतन प्रसन्न होतात.
त्याचप्रमाणे व्यष्टीमध्ये प्राणाची कृपा झाली, कृपेचा वर्षाव
5 झाला की सर्व इंद्रिये प्रसन्न टवटवीत होतात.
पर्जन्यदर्शन हे साक्षात ईश्वराचेच दर्शन आहे.

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

व्रात्यः त्वं प्राण एकर्षि अत्ता विश्वस्य सत्पतिः।
वयम् आद्यस्य दातारः पिता त्वं मातरिश्व नः॥११॥

अर्थ- हे प्राणा! तू व्रात्य (संस्काररहित) आहेस. तू एकर्षि आहेस. तू अत्ता (अग्नि) आहेस. तू विश्वाचा सत्पति आहेस. खाणाऱ्या तुला आम्ही देणारे आहोत. हे मातरिश्वा! तूच आम्हा सर्वांचा पिता आहेस.

विवेचन- जो संस्कारहीन असतो त्याला व्रात्य म्हटले जाते. इथे प्राणाला व्रात्य म्हटले आहे. कारण - प्रथमजत्वात्) प्राण हा सर्वप्रथम जन्माला आला असल्यामुळे त्याच्यावर संस्कार करण्यासाठी अन्य कोणीही नसल्याने तो असंस्कृत आहे. शिवाय ज्याच्यावर स्वतःवर चांगले संस्कार झालेले असतात अशीच चारित्र्यसंपन्न, सुसंस्कारित व्यक्ती दुसऱ्यावर चांगले संस्कार करू शकते. इथे प्राणाशिवाय अन्य कोणी नसल्याने त्याच्यावर संस्कार कोण करणार? जे मलीन आहे त्यावर संस्कार करून ते शुद्ध करून घेतात. जीव कर्मांचे ओझे घेऊन, कामनांचे गाठोडे घेऊन, अविद्येचा मळ धारण करून जन्माला येतो म्हणून त्याच्यावर विविध संस्कार केले जातात. पण तू मुळातच शुद्ध! तुझ्यावर काय संस्कार करणार? तू एकमेवाद्वितीय! तुझ्यावर संस्कार कोण करणार?

तू एकर्षि- सर्वश्रेष्ठ द्रष्टा आहेस. प्राण हा प्रथमज, अयोनिज आहे. तोच ईश्वर असून सर्वज्ञ- सर्वशक्तिमान- सर्वव्यापी आहे. तो सर्व दैवी सात्त्विक गुणांचे भांडार आहे. तो एकर्षि नावाचा अग्नी आहे. तूच भोक्ता होऊन यज्ञामध्ये अर्पण केलेल्या हविर्द्रव्यांचे ग्रहण करतोस.

©www.madhaveeraghuveer.com

या ते तनूर्वाचि प्रतिष्ठिता या श्रोत्रे या च चक्षुषि।
या च मनसि सन्तता शिवां तां कुरु मोत्क्रमीः ॥१२॥

अर्थ- (हे प्राणा) तुझे जे स्वरूप वाणीमध्ये, कर्णामध्ये, नेत्रांमध्ये व मनाला व्याप्त करणारे स्थित आहे. ते तू स्थिर, शांत कर. तू या शरीरामधून कधीही उत्क्रमण करू नकोस.

विवेचन- तुझा जो अंश वाणीत, कानात, डोळ्यांत, मनात भरलेला आहे, व्याप्त आहे तो आमचे मंगल करणारा आहे असू दे. तू हे शरीर सोडून जाऊ नकोस.

वाणीने आम्ही विचार अभिव्यक्त करतो. कानांनी ऐकतो डोळ्यांनी पहातो. ही सर्व मुख्य प्रातिनिधिक इंद्रिये आहेत व या सर्वांच्या मागे असलेल्या मनात प्राणांचीच मुख्य शक्ती भरून राहिली आहे.

वाणीला वक्तृत्वाची शक्ती प्राप्त होते ती तुझ्यामुळे. कानामध्ये तुझे स्वरूप असल्याने श्रवणशक्ती प्राप्त होते. डोळे तुझ्यामुळेच पाहू शकतात. मन संकल्पादि व्यापारामध्ये प्रवृत्त होते. सर्व शरीर व इंद्रियांमध्ये तुझेच स्वरूप आहे. ते तू स्थिर व शांत कर. म्हणजेच तू या शरीराला सोडून बाहेर जाऊ नकोस. तुझ्या उत्क्रमणाने माझे शरीर अपवित्र अमंगल करू नकोस. तू गेलास तर आमच्यातील ही शक्ती जाईल. तू जाऊ नकोस.

मंदिराच्या गाभाऱ्यात परमेश्वराच्या विग्रहाच्या स्थापनेनेच मंदिर पवित्र बनते. म्हणूनच आपण त्याला प्राणप्रतिष्ठा म्हणतो. प्राणप्रतिष्ठेशिवाय त्याला मांगल्य प्राप्त होत नाही. त्याच प्रमाणे हे शरीर स्वभावतःच अशुचि - अपवित्र असून मलमूत्र कृमिकीटकांनी युक्त असून अशुद्ध आहे. मात्र याच शरीराला प्राणाच्या अस्तित्वामुळे पावित्र्य प्राप्त होते.

Birthday / Anniversary देह देवाचे मंदिर । आत आत्मा परमेश्वर ॥

© www.madhaveelaghuveer.com

प्राणस्येदं वशे सर्वं त्रिदिवे यत्प्रतिष्ठितम् । मातेव पुत्रान् रक्षस्व श्रीश्च प्रज्ञां च विधेहि न इति ॥१३॥

अर्थ - स्वर्गामध्ये जे जे काही प्रतिष्ठित आहे, ते सर्व प्राणाच्या आधीन आहे. म्हणून हे प्राणा! माता जसे पुत्रांचे रक्षण करते तसे तू आमचे रक्षण कर. आम्हाला तू धन व बुद्धी प्रदान कर.

विवेचन - इहलोक व परलोक यामधील सर्व विषयांचे प्राणच रक्षण करतो. म्हणूनच हे प्राणा! तू आमचे सुद्धा रक्षण करावेस. आई जसे आपल्या पुत्रांचे सर्व बाजूंनी रक्षण करते, सर्वतोपरी काळजी घेते. मुलाला योग्य मार्गदर्शन करते, वाईट मार्गापासून परावृत्त करते, त्याचे अधःपतना-पासून रक्षण करते त्याचप्रमाणे इंद्रिये प्राणाला प्रार्थना करतात की तू आमचे रक्षण कर. आमचा उत्कर्ष कर. आमचा उत्कर्ष व्हायचा असेल तर धन बुद्धी आवश्यक आहे. ब्राह्मणांच्या मुखामध्ये सतत वेदमंत्र असणे हेच त्याला भूषणावह आहे. बुद्धि, ज्ञान, विद्या हेच ब्राह्मणाचे खरे धन, ऐश्वर्य आहे. तसेच धन, ऐश्वर्य, सत्ता, राज्याच्या अधिकाधिक विस्तारलेल्या सीमा ही क्षत्रियांची खरी लक्ष्मी आहे. याप्रमाणे ब्राह्मणाची सरस्वती व क्षत्रियांची लक्ष्मी या दोन्हीही प्राणाच्या आधीन आहेत.

म्हणूनच हे प्राणा! तू आम्हाला धन, ऐश्वर्य तर देच परंतु त्याचबरोबर सद्बुद्धी दे. कारण धन मिळाल्यावर त्याचा योग्य विनियोग व्हायचा असेल तर त्यासाठी सुबुद्धी, सारासार विवेक आवश्यकच आहे. श्री म्हणजे पैसा चांगलाच असतो. परंतु धनवान व्यक्तीकडे विवेकाचा अभाव असेल तर तो वाईट होतो.

Birthday / Anniversary

याप्रमाणे सर्वात्मस्वरूप असणाऱ्या प्राणाची इंद्रिये स्तुती करतात.

© www.madhaveeraghuveer.com

4 SUN APR 2010

Priority

Wk 13, 094-271

April 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

या त्रैलोक्यातील सर्व गोष्टी या प्राणाच्या आधीन
8 am आहेत. भगवंताच्या इच्छेशिवाय या जगातले पानही
9 हलत नाही. त्याने दिलेल्या शक्तीशिवाय बीज अंकुरणार
नाही; पंचमहाभूते ही असणार नाहीत. वारा वाहणार नाही.
10 प्रत्येक गोष्टीत, कृतीत त्याची शक्ती आहे. त्याचं
वास्तव्य आहे. माणसाच्या प्रयत्नांनाही त्याची कृपा
11 असेल तरच फळ येते

पण म्हणून आपण प्रयत्नच करायचा नाही असे नाही.
12 त्याने इंद्रिये, मन, बुद्धी दिली आहे. त्यांच्या जोरावर
उत्तम प्रयत्न करायचा. पण त्याची कृपा हवी हे मात्र
1 pm विसरून चालणार नाही. त्याची कृपा केव्हा मिळेल?
त्याला आवडेल असे वागू तेव्हाच!

आम्ही शुभाचाच ध्यास घेऊ. देवहितासाठीच
2 आयुष्य वेचू. म्हणजे देव प्रसन्न होईल. समष्टीच्या
3 हितासाठी केलेले संकल्प त्याला आवडतात. त्याने तो
प्रसन्न होतो. जो आवडतो सर्वांना तोचि आवडे देवाला!
4 अशा जनकल्याणासाठी झटणाऱ्या माणसाला तो सहाय्य करतो.

पण शेवटी माणूसच आहे. चुकू शकतो. वाईटाचे,
5 भोगाचे आकर्षण नेहमी टाळता येईलच असे नाही. म्हणूनच
प्रार्थना - आई जशी आपल्या मुलांना सांभाळते तसे आम्हाला
6 सांभाळ. आमच्या चुका पोटात घाल. आम्हाला चांगल्या
मार्गावर ठेव व आम्हाला श्री म्हणजे कांती, कार्य
7 करण्याची शक्ती व प्रज्ञा म्हणजे सद्बुद्धी दे. वाईट
विचार आमच्या मनात न उठोत. आमच्यावर तू सदैव
कृपादृष्टी ठेव

© www.madhaveeraghuveer.com

Birthday / Anniversary

8 April 2013

## तृतीय खण्ड

8 am

अथ हैनं कौसल्याश्चाऽश्वलायनः पप्रच्छ। भगवन्कुत
9 एष प्राणो जायते कथमायात्यस्मिन्शरीर आत्मानं
वा प्रविभज्य कथं प्रातिष्ठते केनोत्क्रमते कथं
10 बाह्यमभिधत्ते कथमध्यात्ममिति॥१॥

11 अर्थ - यानंतर पिप्पलाद मुनींना अश्वलायनाचा पुत्र कोसल
देशाहून आलेला कौसल्य प्रश्न विचारतो की, हे भगवन्
12 हा प्राण कोणत्या कारणापासून उत्पन्न होतो? हा प्राण
या शरीरामध्ये कसा येतो? तसेच तो प्राण स्वतःचे
1 pm विभाजन करून या शरीरामध्ये कसा राहतो? तो प्राण
कोणत्या कारणाने उत्क्रमण पावतो? तसेच तो प्राण
2 बाह्य तसेच अभ्यंतर शरीराला कसे धारण करतो?

3 विवेचन - प्राणांचे महत्त्व जाणून घेता घेता मनात आणखी
जाणून घेण्याची जिज्ञासा प्रकट होत होती. म्हणून कोसल
4 देशाहून आलेला आश्वलायन म्हणाला. भगवन् आपण ज्या
प्राणांची आता स्तुती केली हा श्रेष्ठ प्राण कुणापासून
5 जन्माला येतो? हे शरीर तर जड आहे. त्याच्यात प्राणांच्या
संचार झाला की ते जिवंत होते. पण तो शरीरात जातो
6 कसा? स्वतःला पाच ठिकाणी विभागून तो कसा राहतो?
कशा रीतीने शरीरातून बाहेर पडतो? या शरीराला
7 आतून व बाहेरून कशा प्रकारे धारण करतो? कृपा
करून सांगाल का?

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

तस्मै स होवाचातिप्रश्नान् पृच्छसि । ब्रह्मिष्ठोऽसीति तस्मात्तेऽहं ब्रवीमि ॥ २ ॥

अर्थ- कौसल्याला पिप्पलाद मुनी म्हणाले की तू प्राणाविषयी अतिशय कठीण प्रश्न विचारीत आहेस. तू महान ब्रह्मज्ञानी पुरुष आहेस. म्हणूनच मी तुला या प्रश्नांची उत्तरे देतो.

विवेचन- अन्य साधक सामान्यतः सूक्ष्म सामान्य प्रश्न विचारतात. कठीण प्रश्न विचारण्यासाठी प्रथम मनामध्ये विचार करावा लागतो. तसेच मनही शांत, अंतर्मुख व सूक्ष्म असणे आवश्यक आहे. मन सूक्ष्म होण्यासाठी ते बाह्य सर्व विषयांच्यापासून व विकारांपासून निवृत्त होऊन शुद्ध झाले पाहिजे तरच साधक ब्रह्मविषयक विचार करू शकेल.

येथे प्रश्न विचारणारा कौसल्य हा सूक्ष्म व एकाग्र बुद्धीचा आहे. म्हणूनच पिप्पलाद मुनी त्याला म्हणतात – तू ब्रह्मनिष्ठ पुरुष आहेस. म्हणून तुझ्या प्रश्नांची मी उत्तरे देतो.

दुसरा अर्थ असा की - पिप्पलाद मुनींनी एक वर्षभर तपश्चर्या करून सगुण ब्रह्मामध्ये निष्ठा प्राप्त करून घ्यावी असा आदेश दिला होता. कौसल्य या शिष्याने एक वर्षभर कठोर तपश्चर्या, साधना केलेली आहे हे सिद्ध होते. म्हणून पिप्पलाद मुनी कौसल्यावर अत्यंत संतुष्ट व प्रसन्न होऊन त्याला प्रोत्साहन देण्यासाठी शिष्याची व त्याने विचारलेल्या प्रश्नांची स्तुती करतात.

© www.madhaveeraghuveer.com

May 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

*Priority*

9 April 2013.

WED APR 2010 **7**

Wk 14, 097-268

8 am
आत्मन: एष: प्राणो जायते। यथैषा पुरुषे छाया
एतस्मिन् आततम् मनोकृतेनाऽऽयात्यस्मिञ्छरीरे ॥३॥

9
अर्थ - हा प्राण आत्मस्वरूपापासून उत्पन्न होतो. जसे
10
मनुष्याच्या शरीरापासून छाया उत्पन्न होते, त्याचप्रमाणे
प्राण हा ब्रह्मामधून निर्माण होऊन तो ब्रह्मामध्येच
11
समर्पित आहे. प्राण मनाच्या संकल्पवृत्तीने शरीरामध्ये
प्रवेश करतो.

12
विवेचन - जसे पुरुषापासून त्याची छाया म्हणजे सावली
1 pm
उत्पन्न होते, तसेच आत्म्यामधून प्राण निर्माण होतो.
सावली ही पूर्णत: पुरुषावर अवलंबून असते. जसा पुरुष
2
हलतो तशी छाया हलते. छायेचे अस्तित्व सर्वस्वी पुरुषाच्या
अस्तित्वावर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे आत्म्यामधून
3
प्राणरूपी छाया निर्माण होते. आत्मा हा निमित्त असून
प्राण हा नैमित्तिक आहे म्हणून प्राण हा आत्म्यामध्येच समर्पित
4
होतो. आत्मा हा सत्य असून प्राण हा अनृत भासात्मक आहे.
आत्मा प्राण व अप्राण यांना व्याप्त करतो.
5
आता दुसरा प्रश्न - हा शरीरात कसा जातो? तर मनोकृतेन।
प्राण हा शरीरामध्ये मनाच्या वृत्तीरूपाने प्रवेश करतो. मनाने
6
केलेल्या संकल्पामुळे हा शरीरात प्रवेश करतो. इच्छा झाल्या की
त्यांच्या पूर्तीसाठी शरीर हवे. माणसाच्या अतृप्त इच्छा पूर्ण
7
करण्यासाठी योग्य त्या शरीरात प्राण प्रवेश करतो. विशेषत:
मरताना ज्या वासना तीव्र असतात त्यांची पूर्ती करून घेण्याची
प्राणांना फार निकड लागते. व तसे शरीर त्याला मिळते.
व्यापारी - दुकानातील उंदीर , जड भरत - हरिण.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

यथा सम्राट एव अधिकृतान् विनियुक्ते एतान् ग्रामान् अधितिष्ठस्व, इति, एवम् एव एषः प्राणः इतरान् प्राणान् पृथक् पृथक् एव संनिधत्ते ॥ ४॥

**अर्थ-** ज्याप्रमाणे राजाच 'तुम्ही या गावांना व तुम्ही या गावांमध्ये निवास करा' असे अधिकाऱ्यांना नियुक्त करतो, त्याचप्रमाणे हा मुख्य प्राणही अन्य इंद्रियांना त्यांच्या स्थानानुसार भिन्न भिन्न प्रकारे नियुक्त करतो.

**विवेचन-** शरीर हेच जणू काही प्रचंड मोठे राज्य आहे. त्यामध्ये अनेक गावे म्हणजेच अनेक विभाग-अवयव-संस्था आहेत. त्यामुळे मुख्य प्राण अन्य चक्षुरादि इंद्रियांना त्यांच्या स्थानानुसार, योग्यतेनुसार शरीरामधील त्या त्या स्थानाचे नियामकत्व देऊन त्यांना नियुक्त करतो. एकाच्या अधिकारक्षेत्रात दुसरा अधिकारी ढवळाढवळ करत नाही, त्याप्रमाणे इथेही प्रत्येकाचे आपापले क्षेत्र आहे.

जसा व्यक्तीचा प्राण म्हणजे जीवप्राण तसा विश्वाचा प्राण आदित्य हा आहे. जसा श्वास हा स्थूल प्राण तसा आकाशात संचार करणारा वायू 'मातरिश्वा' हा सर्व विश्वाचा श्वास प्राण आहे. शरीरात जसे पाच प्रधान वायू काम करतात तसेच विश्वात ही पाच प्रधान कार्य पाच वायू करत असतात.

© www.madhavaraghuveer.com

Birthday / Anniversary

पायूपस्थे अपानं चक्षुः श्रोत्रे मुखनासिकाभ्यां प्राणः स्वयं प्रातिष्ठते, मध्ये तु समानः। एष एतत् हुतम् अन्नं समं नयति तस्मात् एताः सप्तार्चिषो भवन्ति ॥ ५॥

अर्थ - हा मुख्य प्राण पायु व उपस्थामध्ये अपानवायूला (नियुक्त करतो) डोळे, कान - मुख नासिका यामध्ये स्वतः मुख्य प्राण प्रतिष्ठित होतो. मध्यभागी समान वायु स्थित होतो. हा समान वायू खाल्लेले सर्व अन्न शरीराच्या सर्व भागात समप्रमाणात पोहचवतो. त्यामधूनच सात प्रकारच्या ज्वाला निर्माण होतात.

विवेचन - अपान वायूची अधोगती असते म्हणून मलमूत्र विसर्जनाचे कार्य त्याच्याकडे दिले आहे. शरीरातील प्रमुख इंद्रिये म्हणजे चक्षु, श्रोत्र, मुख व नासिका यामध्ये श्वासरूप प्राण स्वतः राहतो व त्यांचे कार्य नीटपणे चालवतो. शरीराच्या मध्यभागी म्हणजे नाभीजवळ समान वायूला ठेवले आहे. आपण जठराग्नीला अन्नाची आहुती देतो. त्याचे पुढे काय होते? खाल्लेल्या अन्नात कठीण, मऊ, घट्ट द्रव असे सर्व प्रकार असतात. त्या सर्वांना घुसळून त्याचे एका रसात रुपांतर करण्याचे काम हा समान वायू करतो. समान भावाने समान रसरूप बनवलेले अन्न समान वायू सर्वांना पोहचवतो सर्व इंद्रियांना अन्नामुळे शक्ति व सामर्थ्य प्राप्त होते. खूप काळ अन्नग्रहण केले नाही तर इंद्रिये क्षीण होतात.
आपण जे अन्न ग्रहण करतो तेच इंधन आहे. ते इंधन अग्नीमध्ये टाकल्यामुळे सात ज्वाळा निर्माण होतात. दोन नेत्र, दोन कर्ण, दोन नासापुटे व मुख-रसना यांना त्या ज्वाळा उर्जा पुरवतात. शरीरातील महत्वाच्या इंद्रियांना तेजस्वी करतात. प्रकाशित करतात. प्राणाच्या सहाय्याने जीवाला दृश्य विषयांचे ज्ञान प्राप्त होते

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

हृदि हि एष: आत्मा। अत्र एतत् एकशतं नाडीनां, तासाम् शतं शतं एकैकस्यां द्वासप्तति: प्रतिशाखानाडी सहस्राणि भवन्ति, आसु व्यान: चरति॥ ६॥

अर्थ- हा आत्मा निश्चितपणे हृदयामध्ये स्थित आहे. शरीरात एकशे एक मुख्य नाड्या आहेत. त्या प्रत्येक नाडीच्या शंभर शंभर शाखा आहेत. त्या निर्माण झालेल्या शाखांच्या प्रत्येकी ७२ हजार-७२ हजार उपशाखा आहेत. या सर्वांच्यामध्ये व्यान वायू संचार करतो

विवेचन- हा आत्मा-जीव प्राण हृदयामध्ये रहातो. हृदि सन्निविष्ट:। या हृदयातून १०० मुख्य नाड्या व एक नाडी बाहेर पडते. (ही एकशे एकावी नाडी ही नाडी नसून सूक्ष्म मार्गिका आहे. तिला आपण सुषुम्ना नाडी म्हणतो.) त्यांच्या ७२-७२ उपशाखा, त्यांच्या हजार हजार उपउपशाखा असतात. शरीरात ७२ करोड नाड्या असतात. या सर्वांमध्ये व्यानाचे विचरण असते. व्यापनात् व्यान:। जो सर्वांना व्याप्त करतो त्याला व्यान असे म्हणतात. सूर्य जसा आपल्या हजारो किरणांनी संपूर्ण विश्वाला व्याप्त करतो त्याप्रमाणे हा व्यान वायू हृदयापासून निघून सर्व ठिकाणी जाणाऱ्या नाड्यांमधून संपूर्ण देहाला नखशिखान्त व्याप्त करून रहातो. असे असले तरी विशेष रूपाने सांधे, खांदे व मर्मदेश म्हणजे जननेंद्रिय या स्थानामध्ये तो असतो. जेव्हा प्राण व अपान दोन्हीही कार्यरत नसतात तेव्हा व्यान वायू वीर्यवान् कर्ता होतो. प्राण व अपान यामधील संधिकाळ त्यालाच 'श्वास रोखणे' असे म्हणतो तेव्हा व्यान वायु कार्य करतो. व्यान वायुमुळे साहसी, पराक्रमी कृत्ये केली जातात. जेव्हा एखादा वीर पुरुष धनुष्याची प्रत्यंचा खेचून श्वास रोखतो तेव्हा तिथे व्यानवायू कार्यरत असतो. प्राण व अपानाच्या अनुपस्थितीत व्यान वायुमुळे धाडसी कृत्ये घडतात



©www.madhavieraghuveer.com

अथ एकया उदानः ऊर्ध्वं (चरति) पुण्येन पुण्य लोकं नयति । पापेन पापं (लोकं नयति) उभाभ्याम् एव मनुष्यलोकं नयति ॥ ७ ॥

अर्थ- त्याप्रमाणे (त्या एकशे एक नाड्यांपैकी) एका नाडीद्वारा ऊर्ध्व जाणारा उदान वायु (जीवात्म्याला) पुण्यकर्माने पुण्यलोकाला नेतो, पापकर्माने पापलोकाला नेतो, आणि पुण्यपापात्मक मिश्रित कर्माने मनुष्यलोकाला नेतो.

विवेचन. शरीरामध्ये प्रमुख एकशेएक नाड्या आहेत. त्यामधील एक सुषुम्ना नावाची नाडी ऊर्ध्वगामिनी आहे. त्या नाडीमधून उदान वायु शरीराच्या खालच्या भागापासून मस्तकापर्यंत संचार करतो. उदान वायु जीवाला मृत्युनंतर त्याच्या त्याच्या कर्मानुरूप ऊर्ध्वयोनी, अधोयोनी किंवा मनुष्ययोनीला घेऊन जातो. जसे कर्म असेल तसे जीवाला फळ मिळते. प्रत्येक जीवाला त्याच्या कर्मानुसार फळ व गती प्राप्त होते. ऊर्ध्वं गच्छन्ति सत्वस्था — ज्ञानी, योगीयांचे प्राण या सुषुम्ना नाडीतून वरती ब्रह्मरंध्रातून बाहेर पडतात. त्या आत्म्याला वर घेऊन जाण्याचे काम हा उदान वायु करत असतो. माणसाच्या पाप-पुण्यानुसार त्याचे गन्तव्य ठरते व त्या गन्तव्यापर्यंत जीवाला ढकलत नेण्याचे काम हा उदान वायु करत असतो.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

आदित्यो ह वै बाह्यः प्राण उदयत्येष ह्येनं चाक्षुषं प्राणम् अनुगृह्णानः। पृथिव्यां या देवता सैषा पुरुषस्य अपानम् अवष्टभ्य (रतीते) अन्तरा यत् आकाशः सः समानो वायुः व्यानः॥ ८॥

अर्थ- निश्चितपणे सूर्य हाच बाह्य प्राण आहे. हाच प्राण चक्षुमधील प्राणावर अनुग्रह करून उदय पावतो, पृथ्वीमध्ये जी देवता आहे ती देवता पुरुषाच्या अपान वायूला स्वाधीन करून राहते. जे आकाश आहे ते समान वायू आहे आणि यापासून भिन्न असणारा वायू व्यान आहे.

निवेचन- माणूस जिवंत असल्याची खूण म्हणजे त्याच्या डोळ्यातील तेज आहे. सूर्याचा डोळ्याशी संबंध आहे. डोळ्यांना चमक, बघण्याची दृष्टी तोच देतो. शरीरातील नाड्यांतून उर्जा तोच भरतो. असा विश्वावर कृपा करणारा सूर्य उदयाला येऊन सारे विश्व प्राणयुक्त करतो.

पृथ्वीमधील गुरुत्वाकर्षण हे अपानाचे कार्य आहे. या पृथ्वीमध्ये जो अपानवायूरुप देवता आहे तो मनुष्याच्या शरीरातील अपानवायूला स्थिर करून ठेवतो असा विश्वावर कृपा करणारा सूर्य उदयाला येऊन सारे विश्व प्राणयुक्त करतो. आतून बाहेरून तो शरीराला स्वस्थ आरोग्यसंपन्न ठेवतो. पृथ्वी व स्वर्ग यामध्ये जी पोकळी आहे, पुनः म्हणजेच जे आकाश आहे तो समानवायूचे कार्य करतो, आकाश सर्वत्र असते त्यामुळे शरीर राहू शकते. शरीराचे अशा रीतीने रक्षण होते व शरीरातही समान वायूला हलण्यासाठी जागा मिळते. शरीरात पाच आकाश-स्थाने आहेत. शरीरात जसा सर्वत्र व्यानाचा संचार असतो तसा ब्रह्मांडात विचरण करणारा व्यान आहे. त्यामुळे ब्रह्मांडात हालचाल होते. शरीरात सांध्यांची हालचाल व्यानामुळे होते.

© www.madhaveeraghuveer.com

तेजो ह वाव उदानस्तस्मादुपशान्ततेजा:
पुनर्भवमिन्द्रियैर्मनसि सम्पद्यमानैः ॥९॥

अर्थ - निश्चितपणे सूर्यामधील तेज हाच उदान वायु आहे. ज्या शरीरामधील उष्णता शांत होते तेव्हा हा उदान वायू इंद्रियांच्यासह मनामध्ये विलीन होतो व पुन्हा दुसऱ्या देहाला प्राप्त होतो.

विवेचन - सूर्य व अग्नीचे तेज म्हणजेच उष्णता म्हणजेच ब्रह्मांडातील उदान वायु आहे. शरीरातील उष्णता कायम ठेवण्याचे काम हा बाहेरून करत असतो आणि उदान शरीरातील उष्णता ही कायम ठेवतो. ज्याच्या शरीरातून उदानवायू बाहेर पडतो त्याचे शरीर गार पडते. मग सर्व इंद्रिये मनात विलीन पावतात व मन प्राणात विलीन पावते. व ते उदानाबरोबर बाहेर पडते आणि पुन: जन्म घेण्यासाठी ~~xxx~~ उदानवायुबरोबर प्राण मन इंद्रियांसह सज्ज होतो. माणूस झोपतो तेव्हा सर्व इंद्रिये मनात विलीन होतात. म्हणून स्वप्नात माणूस सर्व क्रिया करू शकतो. मृत्युसमयी इंद्रियांसह मन प्राणांत विलीन होते व प्राण यांच्यासह बाहेर पडतो.

प्राणोत्क्रमणाच्या वेळी उदान वायू स्थूल शरीराला बरोबर घेऊन जात नाही. तर इंद्रियांच्या शक्ती, मन मनामधील वासना सूक्ष्म संस्कार या सर्वांना बरोबर घेऊन पुढच्या शरीरामध्ये जातो.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

यच्चित्तस्तेनैष प्राणमायाति प्राणस्तेजसा युक्तः।
सहाऽऽत्मना यथासंकल्पितं लोकं नयति॥१०॥

अर्थ - (मृत्युसमयी) ज्याचे जसे चित्त असेल त्या संकल्पासह हा जीव प्राणवृत्तीला प्राप्त होतो. तसेच तो प्राण तेजाने युक्त होऊन भोक्ता असणाऱ्या जीवासह संकल्पानुरूप त्या त्या देहाला प्राप्त होतो.

विवेचन - नैसर्गिक मृत्युच्या वेळी मनामध्ये जो संकल्प असेल त्या संकल्पाने युक्त होऊन जीव इंद्रियांच्या सर्व शक्ती हळूहळू खेचून घेतो. त्या सर्व शक्ती एकत्रित होऊन नंतर मुख्य प्राणात लीन होतात. जीव तेव्हा मुख्य प्राणवृत्तीनेच जिवंत रहातो. इंद्रियांच्या शक्ती मुख्य प्राणामध्ये लीन झाल्यामुळे इंद्रियांचे व्यापार शांत होतात. त्यावेळी त्या व्यक्तीस डोळ्यांना दिसत नाही, कानांना ऐकू येत नाही. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या कशाचेही ज्ञान होत नाही. इंद्रियांचे व्यापार व मनाच्या वृत्तीही क्रमाने लय पावतात. फक्त प्राणवृत्ती रहाते.

मुख्य प्राणामध्ये सर्व शक्ती एकत्रित झाल्यामुळे तो प्राण तेजाने म्हणजे उदानवायूने युक्त होतो. शरीरामधील उदान वायू फक्त मृत्युसमयीच कार्यरत होतो. अन्तो मतिः सा गतिः। शेवटी मनाला जी इच्छा असते तिकडे उदान वायू प्राणांना एकत्रित घेऊन जातो. सारी इंद्रिये मनात विलीन झालेली असतात. मन संकल्पासह प्राणात विलीन होते. प्राण उदान वायूकडून इच्छित ठिकाणी नेला जातो.

© www.madhaveeraghuveer.com

May 2010 | Priority | THU APR 15 2010 | Wk 15, 105-260

य एवं विद्वान्प्राणं वेद न हास्य प्रजा
हीयतेऽमृतो भवति तदेष श्लोकः ॥११॥

अर्थ- जो विद्वान पुरुष पूर्वोक्त विशेषणांनी युक्त असणाऱ्या प्राणाला ज्याप्रमाणे जाणतो, त्याची प्रजा नष्ट होत नाही, तो अमृतस्वरूप होतो. त्या अर्थी हा मंत्र आहे.

विवेचन- प्राण हा महत्त्वपूर्ण आहे. जो स्वतः पाच भागात विभागून आतून बाहेरून शरीराचे कसे रक्षण करतो हे जो जाणतो तो त्या प्राणांना महत्त्व देऊन जगेल त्याचे फळ म्हणून त्याची संतती दीर्घायुष्य प्राप्त करेल जो हे ज्ञान जाणतो तो प्राण ज्या परमेश्वरापासून निघाले आहेत त्या परमेश्वराला विसरणार नाही. व परमेश्वराचे स्मरण करीत मृत्यु आला तर अमरत्व होईल प्राणाचे स्वरूप जाणणाऱ्या विद्वान पुरुषाची प्रजा कधीही नष्ट होत नाही. त्याची प्रजा पुत्र-पौत्र-प्रपौत्र रूपाने अखंड रहाते. हेच ऐहिक फळ आहे. तसेच त्याला स्वर्गादि ऊर्ध्वलोकांची म्हणजेच अमृतत्वाची प्राप्ती होते. हे आमुष्मिक फळ आहे. शरीरपातानंतर त्याला सायुज्य मुक्ती मिळते. सकाम प्राणोपासकांना हे फळ प्राप्त होते. मात्र जो निष्काम भावनेने उपासना करत असेल त्याला यामुळे चित्ताची एकाग्रता प्राप्त होते. चित्ताची शुद्धी होऊन तो सत्वगुणप्रधान होतो चित्तशुद्धीद्वारा तो उपासक क्रमाने हिरण्यगर्भावस्था प्राप्त करून कल्पांतापर्यंत तो सत्यलोकात रहातो. प्रलयकाळी त्याला ब्रह्माबरोबरच मुक्ती मिळते तो पुन्हा कधीही या संसाराला प्राप्त होत नाही. याला क्रममुक्ती असे म्हणतात. याला सालोक्य, सामीप्य, सारूप्य सायुज्य अशा चारही मुक्ती प्राप्त होतात. सायुज्य म्हणजेच मोक्ष होय.

Birthday / Anniversary

© www.madhavseeraghuveer.com

उत्पत्तिमायतिं स्थानं विभुत्वं चैव पञ्चधा।
अध्यात्मं चैव प्राणस्य विज्ञायामृतमश्नुते
विज्ञायामृतमश्नुत इति ॥१२॥

अर्थ - प्राणाची उत्पत्ति, प्राणाचे आगमन, प्राणाचे स्थान, प्राणाचे व्यापकत्व तसेच प्राणाचे आध्यात्मिक स्वरूप याप्रकारे प्राणाचे भेद जाणून साधक अमृतस्वरूप प्राप्त करून घेतो.

विवेचन - अशा रीतीने प्राणांची उत्पत्ति - जीवप्राण व त्याचा अस्तित्वदर्शक स्थूलप्राण हे परमात्म्यापासून उत्पन्न होतात. परमात्मा हाच त्याचे उपादान कारण Raw-material व निमित्त कारण Creator आहे. त्या प्राणाचे शरीरात होणारे आगमन (आयति) - मनाची जी प्रबळ वासना असते त्याप्रमाणे होणारी देहप्राप्ती - स्थूल प्राणांची शरीरातील विभिन्न स्थाने, जीव प्राणाचे दर्शन सर्वत्र व्यापून असणे - विभुत्व. या प्राणाचे सर्वांवर स्वामित्व असते तोच श्रेष्ठ असतो. हा प्राणच आतून व बाहेरून शरीराला कसा धारण करतो, चालवतो हे सर्व प्राणांचे विज्ञान जो जाणतो - जो अनुभवतो तो अमृतत्व भोगतो. तो अमर होतो. जन्ममृत्युच्या चक्रातून तो सुटतो.

आत्म्यापासून प्राण उत्पन्न होतो कसा? यासाठी आचार्य दृष्टांत देतात - छाया इव देहे। प्राण हा पुरुषाच्या छायेप्रमाणे आहे. छाया ही पुरुषापासून भिन्न न होता त्याच्यामध्ये समर्पित होते. छायेला पुरुषाशिवाय स्वतंत्र अस्तित्व नसते. ती पुरुषावर अवलंबून असते. पुरुष सत्य असून छाया अनृत, भासात्मक असते. व्यष्टिमधील प्राणाला आध्यात्मिक तर समष्टीमधील



© www.madhaviveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

8 am (बाह्य) प्राणाला आधिदैविक प्राण असे म्हणतात.
समष्टी प्राण विश्वामध्ये आदित्यरूपाने राहून
9 किरणांच्या द्वारे सर्वांना व्याप्त करून प्रकाशमान करतो
व सर्वांच्यावर नियंत्रण करतो. समष्टी प्राण व व्यष्टी
10 प्राण हे दोन्ही भिन्न नसून एकरूपच आहेत. जसे
घटाकाश व महाकाश यामध्ये तत्वतः भेद नाही
11 तसेच व्यष्टि प्राण व समष्टि प्राण यात पारमार्थिक भेद नाही.
शरीरातील प्राण हा त्या महाप्राणाचाच अंश आहे.
12 मी त्या परमात्म्याचाच अंश आहे हे जो अनुभवतो तो
देह असूनही विदेही होतो, अमर होतो. तुकाराम महाराज
1 pm म्हणतात - माझी कायाच विठ्ठल झाली ती अशी झाली.
प्राणाचे रहस्य जाणल्यामुळे झाली.
2 द्विरुक्ती समाप्ति सूचक असते. प्रश्नोपनिषदामधील
तृतीय प्रश्न समाप्त झाला हे पिप्पलाद मुनींना सुचवायाचे
3 आहे. आश्वलायनाच्या प्रश्नाला उत्तर देऊन झाले आहे.

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeradhuveer.com

## चतुर्थः प्रश्नः

अथ ह एनं सौर्यायणी गार्ग्यः पप्रच्छ भगवन् एतस्मिन् पुरुषे कानि स्वपन्ति? कानि अस्मिन् जाग्रति? कतरः एषः देवः स्वप्नान् पश्यति? कस्य एतत् सुखं भवति? कस्मिन् नु सर्वे सम्प्रतिष्ठिताः भवन्ति? इति ॥ १ ॥

**अर्थ** - यानंतर पिप्पलाद मुनींना सूर्याचा पुत्र सौर्यायणी गार्ग्य हा शिष्य प्रश्न विचारतो की हे भगवन् ! या पुरुषामध्ये कोणती (इंद्रिये) झोपतात? कोणती जागृत असतात? यामधील कोणते इंद्रिय स्वप्न पाहते? हे सुख कोण अनुभवते? ही सर्व इंद्रिये कोठे प्रतिष्ठित असतात?

**विवेचन** - जागृती म्हणजे काय? सर्व जाणिवा जागृत असतात. सर्व इंद्रिये आपापली कामे करीत असतात. मग माणूस झोपतो तेव्हा काय होते? त्यावेळी ही कुणी तरी या शरीरात जागा असतो का? कारण आपण स्वप्न तर बघतो. त्यातील अनुभव खरे असतात. हे अनुभव घेणारा कोण असतो?

इथे कार्य म्हणजे शरीर आणि करण म्हणजे इंद्रिये होय. म्हणून शरीर व इंद्रिये यांना मिळून कार्यकरणसंघात म्हटले जाते. शरीर हे जड असून ते स्वतःसाठी नाही तर देहधारी जीवासाठी आहे. देह हा पूर्णतः जीवावर अवलंबून आहे.

कार्य हे नेहमी त्याच्या कारणामध्येच लय पावते असा न्याय आहे. जसे घट हा मातीमध्येच लय पावतो. सुषुप्तीमध्ये इंद्रिये आपापल्या स्थानातच झोपतात हे सामान्यतः सर्वांना माहीत आहे. परंतु या इंद्रियांच्या शक्तीचा लय कोठे होतो?

© www.madhaveeraghuveer.com

तस्मै सः ह उवाच यथा गार्ग्यः मरीचयः अर्कस्य अस्तं गच्छतः सर्वाः एतस्मिन तेजोमण्डले एकीभवन्ति, ताः पुनः पुनः उदयतः प्रचरन्ति एवं ह वै तत् सर्वं परे देवे मनसि एकीभवन्ति। तेन तर्हि एषः पुरुषः न शृणोति, न पश्यति, न जिघ्रति, न रसयते, न स्पृशते, अभिवदते, न आदत्ते, न आनन्दयते, न विसृजते, न इयायते। स्वपिति इति आचक्षते॥२॥

अर्थ - पिप्पलाद मुनी प्रश्न विचारणाऱ्या शिष्याला म्हणाले की हे गार्ग्य! जसे अस्ताला जाणाऱ्या सूर्याची सर्व किरणे तेजोमंडळ असणाऱ्या सूर्यामध्ये एकत्रित होतात आणि जेव्हा पुन्हा सूर्योदय होतो तेव्हा ती किरणे पुन्हा बाहेर पडून सर्व ठिकाणी पसरतात. याप्रमाणेच, ते सर्व विषय इंद्रियश्रेष्ठ असणाऱ्या मनामध्ये लय पावतात त्यामुळे त्या अवस्थेमध्ये हा पुरुष पहात नाही, ऐकत नाही, वास घेत नाही, स्वाद घेत नाही, स्पर्श करत नाही, बोलत नाही, घेत नाही, उपभोगत नाही, त्याग करत नाही, कोणताही व्यापार करत नाही, त्यावेळी त्याला सर्व लोक हा झोपला आहे असे म्हणतात.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

प्राणाग्नयः एव एतस्मिन् पुरे जाग्रति।
गार्हपत्यो ह वा एषः अपानः व्यानः अन्वाहार्यपचनः।
यत् गार्हपत्यात् प्रणीयते प्रणयनात् आहवनीयः प्राणः ॥३॥

**अर्थ** - या शरीरामध्ये फक्त प्राणाग्निच जागृत असतो. अपान वायु हा गार्हपत्य आहे. व्यान हा अन्वाहार्य पचनाग्नि - दक्षिणाग्नि आहे. जो गार्हपत्य अग्निकडून नयन केले जाते, तोच प्राण प्रणयनामुळे आहवनीय नावाचा अग्नि आहे.

**विवेचन** - अग्नी तीन प्रकारचे असतात. अग्निहोत्री या तिघांची ही सेवा करतात. गार्हपत्य अग्नी प्रत्येक गृहस्थाकडे असतो. तो अरणीचे विधिपूर्वक मंथन करून प्रदीप्त केला जातो. गृहस्थाने याचे रक्षण करायचे असते. अन्वाहार्यपचनः - याला दक्षिणाग्नी असेही म्हणतात. हा पितरांचे अन्न (स्वधा) घेऊन जातो. दर्श-पूर्णमास यज्ञात हविष्य (अन्वाहार्यपचन) दक्षिणाग्निवर शिजवले जाते म्हणून त्याला अन्वाहार्यपचन असे नाव आहे. आहवनीय अग्नी हा देवांना आहुती देण्यासाठी यज्ञकुंडात स्थापित करतात. गार्हपत्य अग्नीच्या कुंडातून याला उचलून आणून यज्ञकुंडात ठेवतात म्हणजे त्याचे प्रणयन करतात (प्र म्हणजे पुढे, नी म्हणजे नेणे) अग्निहोत्री तीन कुंडे तयार करून त्यात तीन अग्नींची स्थापना करून सकाळ संध्याकाळ होम करतात.
इथे या मंत्रात प्राणांना या तीन अग्नींची उपमा दिली आहे

©www.madhavghule.com

Birthday / Anniversary

यत् उच्छ्वासनिःश्वासौ एतौ आहुती। (एतौ यः) समं नयति समानः। मनः ह इति वाव यजमानः। इष्टफलम् एव उदानः। सः एनम् यजमानम् अहः अहः ब्रह्म गमयति॥ ४॥

**अर्थ** - जो उच्छ्वास-निःश्वास या दोन जणू काही आहुती असून त्या आहुती शरीराच्या सर्व भागात सम-प्रमाणात नेतो तोच समान वायु आहे. मन हेच जणू काही यजमान आहे. उदान वायु होय जणू काही (या यज्ञाचे) इष्ट फळ आहे. उदान वायु या (मनरूपी) यजमानाला रोजच्या रोज ब्रह्माच्या जवळ घेऊन जातो.

**विवेचन** - यज्ञ माणसाला स्वर्गलोकी नेतात. निष्काम यज्ञ परब्रह्मापर्यंत नेतात. इथे परब्रह्मापर्यंत पोहोचविण्याचे काम या श्वासरूपी आहुती करतात असे सुचवायचे आहे. श्वास बाहेर जातो व आत येतो याच जणू यज्ञात दिलेल्या आहुती आहेत. या आत येणाऱ्या वायुला जो सर्वत्र समान भावाने पोचवतो तो समान (ऋत्विक) वायू होय. या यज्ञात मन हे यजमानाचे कार्य करत असते. अभीष्ट फळ म्हणजे उदान. तो या यजमानाला दररोज ब्रह्मापर्यंत पोचवण्याचे कार्य करतो. झोपेत मी चे भान सुटते व जीव ब्रह्मापर्यंत पोहोचतो. आपल्या हृदयाकाशात ब्रह्मरंध्रात ब्रह्म आहेच. त्याला भेटून जीवाला अतिशय आनंद होतो. पण त्यावेळी इंद्रिये सुप्त असल्याने त्याला त्या आनंदाची अभिव्यक्ती करता येत नाही. जेव्हा तो जागृतावस्थेत येतो तेव्हा त्या अनुभवाच्या स्मृतीमुळे तो अत्यंत आनंदित उल्हसित होतो.

या मंत्रात अपान, व्यान व प्राण हे मुख्य अग्नि तर समान हा पूरक आणि उदान हा इष्टफलापर्यंत नेणारा मानला आहे. उदान जीवाशिवाची भेट घडवून आणतो पण मध्ये पडदा ठेवून।

© www.madhaveeraghuveer.com

Birthday / Anniversary

8 am अत्र एषः देवः स्वप्ने महिमानम् अनुभवति।
यद् दृष्टं दृष्टं अनुपश्यति श्रुतं श्रुतम् एव अर्थम्
9 अनुशृणोति। देशादिगन्तरैश्च प्रत्यनुभूतं पुनः पुनः
प्रत्यनुभवति, दृष्टं च अदृष्टं च श्रुतं च अश्रुतं च
10 अनुभूतं च अननुभूतं च सत् च असत् च सर्वं
पश्यति, सर्वः पश्यति॥ ५॥

11

**अर्थ** - हा देव स्वप्नावस्थेमध्ये स्वतःचा महिमा अनुभवतो.
12 जागृतावस्थेमध्ये त्याने जे पाहिले तेच (स्वप्नात) पहातो.
जागृतावस्थेमध्ये जे ऐकले तेच (स्वप्नात) ऐकतो किंवा
1 pm जागृतावस्थेमध्ये जे दिशांच्यामध्ये अनुभवले तेच
अनुभवतो. (थोडक्यात) दृष्ट - अदृष्ट, श्रुत - अश्रुत, अनुभवलेले -
2 न अनुभवलेले, सत् - असत् या सर्वांना तो सर्वस्वरूप
देव पाहतो.

3

**विवेचन** - स्वप्न कोण बघतो? या गार्ग्यांच्या प्रश्नाचे उत्तर
4 इथे दिलेले आहे. स्वप्नावस्थेत मन प्राणात विलीन झालेले
नसते. म्हणून एषः देवः म्हणजे सुसंस्कृत मन असा अर्थ आहे.
5 हे मन स्वप्नामध्ये स्वतःच्या अद्भुत शक्तीचा अनुभव
घेते. मनामागे आत्मा ही असतोच. या मनामध्ये सृष्टी निर्माण
6 करण्याचे सामर्थ्य आहे. त्या सामर्थ्याचा उपयोग करून
हे मन स्वप्नसृष्टी निर्माण करते. या दृश्य जगात जे जे
7 पाहिले, ऐकले, अनुभवले आहे ते सर्व पहातो, ऐकतो, अनुभवतो.
परंतु इतकेच नाही तर न पाहिलेलेही पाहतो. न ऐकलेले
ऐकतो. कधीही न अनुभवलेलेही अनुभवतो. परदेशात कधी
न गेलेला मनुष्य स्वप्नात परदेशवारी करतो. विमानात
बसतो. नसलेले घर बांधून त्यात रहातो. हे सर्व
करण्याचे सामर्थ्य मनामध्ये असते. वास्तवात काही नसले तरी
मनच नाना कल्पना करते, स्वप्ने घेते, बघते आणि अनुभवतेही
Birthday / Anniversary
तोच सर्व बनतो व तोच सर्व पहातो. सर्वं पश्यति सर्वः पश्यति।

© www.madhaveeraghuveer.com

8 am ज्यावेळी क्षेत्रज्ञ बाह्य इंद्रिय व मनाने युक्त असतो
तेव्हा जागृतावस्था असते आणि जेव्हा क्षेत्रज्ञ फक्त
9 मनाने युक्त असतो तेव्हा ती स्वप्नावस्था असते.
स्वप्नावस्थेमध्ये बाह्य इंद्रियांचा लय मनामध्ये होतो,
10 त्यावेळी क्षेत्रज्ञ मनाशी तादात्म्य पावून स्वप्नावस्था
अनुभवतो.
11 खरे म्हणजे क्षेत्रज्ञ हा तिन्ही अवस्थांच्या अतीत आहे.
हा झोपतही नाही, जागाही रहात नाही आणि स्वप्नेही पहात नाही.
12 त्यामुळे 'मन स्वप्न पहाते' हे विधान योग्य व तर्कसंगत
आहे. कारण मन आहे तोपर्यंतच मनाच्या उपाधीच्या
1 pm अवस्था आहेत. मनाचा निरास केला की अवस्थांचाही
निरास होतो. मनोमय देव स्वप्ने पहातो. स्वप्नावस्थेमध्ये
2 इंद्रिये मनामध्ये लय पावतात. त्यावेळी मन मात्र लय
पावत नाही. जागृतावस्थेत जे पहातो, ऐकतो त्याचे संस्कार
मनावर होत असतात. तेच स्वप्नावस्थेमध्ये वासनारूपाने
प्रगट होतात. जे अदृष्ट आहे ते स्वप्नात दिसते कारण ते
मागील जन्मात ऐकलेले किंवा पाहिलेले असते. म्हणून येथे
अदृष्ट, अश्रुत, अननुभूत म्हणजे मागील जन्मात पाहिलेले
5 ऐकलेले किंवा अनुभवलेले असा अर्थ घ्यावा. एखादी वस्तू
आपणास अज्ञात असेल तर त्याची कधीही वासना होत नाही.

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

सः यदा तेजसाऽभिभूतो भवति। अत्रैष देवः स्वप्नान्न पश्यत्यथ तदैतस्मिञ्शरीर एतत्सुखं भवति॥६॥

अर्थ - जेव्हा तो (मनोदेव) तेजाने आवृत होतो तेव्हा तेथे हा देव स्वप्ने पहात नाही. त्यानंतर या शरीरामध्ये हे सुख प्राप्त होते.

विवेचन - जेव्हा हे मन उदान वायूने सर्व बाजूंनी झाकले जाते तेव्हा ते मन स्वप्न पाहू शकत नाही. उदान वायू मनाला ढकलत प्राणापर्यंत नेतो त्यावेळी मन ही शांत होते व स्वप्न व्यापार थांबतो. मग या शरीरात केवळ सुखाचेच साम्राज्य असते. जीव शिवापर्यंत पोचतो त्यामुळे त्याला आनंदाखेरीज कसलाच अनुभव येत नाही. निद्रेमध्ये तो अत्यंत सुखात असतो. दुसऱ्या शब्दात शरीरातील चित्त शरीरात राहूनच महाचित्ताशी एकरूप होते. व जीवाला आनंदमय स्थिती प्राप्त होते.

इथे श्रुती सुषुप्ती अवस्थेचे वर्णन करीत आहे. जागृतावस्थेमध्ये मन स्थूल इंद्रियांच्या सहाय्याने बाह्य विश्वाचा अनुभव घेते. यानंतर तेच मन स्थूल इंद्रियांच्या शिवाय स्वप्नावस्थेमध्ये वासनामय पदार्थांचा अनुभव घेते. मात्र तेच मन सुषुप्ति अवस्थेमध्ये मात्र पित्त नावाच्या तेजाने आवृत होते. देहामध्ये जे सप्त धातु आहेत, त्यापैकी पित्त सूर्याच्या उष्णतेमुळे निर्माण होणारा एक धातु आहे. म्हणून इथे त्याला तेज म्हटले आहे.

ज्या द्वारामार्फत वासना अभिव्यक्त होऊन जीवाला स्वप्नावस्था अनुभवता येते ते वासनांचे द्वार पित्ततेजाने बंद होते. त्यामुळे या अवस्थेमध्ये सर्व इंद्रिये, तसेच मनाच्या वृत्ति हृदयामध्ये लय पावतात. त्यामुळे सुषुप्ति अवस्थेमध्ये मनाला कोणताही अनुभव येत नाही. गाढ झोप लागते

© www.madhavaraghuveer.com

May 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

*Priority*

SUN 25 APR 2010

Wk 16, 115-250

8 am

स: यथा सोम्य वयांसि वासोवृक्षम् सम्प्रतिष्ठन्ते एवं
ह वै तत् सर्वं पर आत्मनि सम्प्रतिष्ठते ॥७॥

9

अर्थ - हे सोम्य, ज्याप्रमाणे सर्व पक्षी त्यांच्या निवासाच्या
10 वृक्षावर आश्रय घेतात त्याप्रमाणे निश्चितच हे सर्व
परमात्मस्वरूपामध्ये आश्रय घेतात.

11

विवेचन - ज्याप्रमाणे सगळे पक्षी दिवसभर इकडे तिकडे
12 उडत असले तरी संध्याकाळी आपल्या घरट्यामध्ये परत
येतात ते ज्या वृक्षावर राहत असतात तिथे परत येतात
1 pm त्याचप्रमाणे ज्या परमात्म्यापासून हे सर्व प्राणी, पक्षी,
जीव इकडे-तिकडे जातात व आश्रयाला त्याच्याजवळच
2 येतात. इंद्रियांच्या बाबतीतही असेच घडते. इंद्रिये मनात
व मन प्राणात एकरूप होते. म्हणून निद्रेला 'निद्राप्रलय'
3 सुद्धा म्हणतात. अज्ञानाचा पडदा असल्यामुळे पूर्णतः
एकरूप होत नाही पण जीव तिथपर्यंत जाऊन येतो.
4 त्यामुळे मन, बुद्धि, इंद्रिये सर्व प्राणांत व प्राण परमात्म्यावर
आधीत, आश्रित आहे. सर्वांचा आधार तो परमात्मा आहे.

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

पृथिवी च पृथिवीमात्रा च आपः च आपोमात्रा च तेजः च तेजोमात्रा च वायुः च वायुमात्रा च आकाशः च आकाशमात्रा च चक्षुः च द्रष्टव्यं च श्रोत्रं च श्रोतव्यं च घ्राणं च घ्रातव्यं च, रसः च रसयितव्यं च त्वक् च स्पर्शयितव्यं च वाक् च वक्तव्यं च हस्तौ च आदातव्यं च उपस्थः च आनन्दयितव्यं च पायुः च विसर्जयितव्यं च पादौ च गन्तव्यं च मनः च मन्तव्यं च बुद्धिः च बोद्धव्यं च अहङ्कारः च अहङ्कर्तव्यं च चित्तं च चेतयितव्यं च तेजः च विद्योतयितव्यं च प्राणः च विधारयितव्यं च ॥ ८ ॥

© www.mauliveeraghuveer.com

अर्थ - पृथ्वी व पृथ्वीची मात्रा, पाणी व पाण्याची मात्रा, तेज व तेजाची मात्रा, वायू व वायूची मात्रा, आकाश व आकाशाची मात्रा, चक्षु व द्रष्टव्य विषय, कर्ण व श्रवणीय विषय, घ्राणेंद्रिय व घ्रातव्य विषय, रसना व रसयितव्य विषय, त्वचा व स्पर्शनीय विषय, वाणी व वक्तव्य विषय, हात व ग्राह्य विषय, उपस्थ व आनंदयितव्य विषय, पायु व विसर्जयितव्य विषय, पाय व गन्तव्य विषय, मन व मननीय विषय, बुद्धि व ज्ञेय विषय, अहंकार व त्याचा विषय, चित्त व चिंतनीय विषय, तेज व तेजाचा विषय, प्राण व प्राणाचा विषय हे सर्व परमात्मस्वरूपात लय पावतात, प्रतिष्ठित होतात.

विवेचन - इथे पंचमहाभूते, त्यांच्या तन्मात्रा, पंच ज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये, मन, बुद्धि, अहंकार व चित्त, त्यांना पुरवली जाणारी ऊर्जा व प्राण सर्व काही त्या परमात्म्यावरच आश्रित असतात. निद्रेत ते सर्व प्राणात विलीन होऊन परमात्म्यापर्यंत जातात. मात्र अज्ञानाच्या पडद्यामुळे एकरूप होत नाहीत.

Birthday / Anniversary

आकाश, वायु, अग्नि, आप, पृथ्वी ही स्थूल पंचमहाभूते आहेत. त्यांच्या तन्मात्रा म्हणजे शब्द, स्पर्श, रूप, रस गंध म्हणजेच सूक्ष्म पंचमहाभूते आहेत. या सूक्ष्म पंचमहाभूतांच्यामधून स्थूल महाभूते निर्माण होतात. यालाच पंचीकरण म्हणतात. ही प्रक्रिया होत असताना त्यामध्ये सूक्ष्म महाभूतांचे गुण अनुस्यूत होतात.

आकाशामध्ये शब्द हा गुण, वायुमध्ये शब्द व स्पर्श, अग्निमध्ये शब्द, स्पर्श व रूप, पाण्यामध्ये शब्द, स्पर्श, रूप व रस हे गुण आहेत. तर पृथ्वीमध्ये शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे गुण अनुस्यूत आहेत. पृथ्वी हे सर्वात स्थूल महाभूत असल्याने त्यात सर्व गुण अंतर्भूत आहेत.

यानंतर पंच ज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये, अंतःकरण- मन, बुद्धि, चित्त, अहंकार आहेत. याशिवाय तेज व प्राण आहे.

त्या प्राणामध्ये संपूर्ण कार्यकरणसंघात एकत्र ग्रथित होऊन त्यामध्ये सुसूत्रता निर्माण होते. त्या प्राणाला सूत्रात्मा असे म्हणतात.

Birthday / Anniversary

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

एष हि द्रष्टा स्प्रष्टा श्रोता घ्राता रसयिता मन्ता बोद्धा कर्ता विज्ञानात्मा पुरुषः। सः परे अक्षरे आत्मनि सम्प्रतिष्ठते॥ ९॥

अर्थ - हा (जीव) पहाणारा, स्पर्श करणारा, ऐकणारा, वास घेणारा, चव घेणारा, मनन करणारा, जाणणारा, कर्म करणारा असा हा विज्ञानात्मा पुरुष आहे. तो (सुषुप्तीच्या वेळी) निरतिशय अक्षरस्वरूप आत्म्यामध्ये सम्यक् रूपाने स्थित होतो.

विवेचन - विज्ञानपुरुष म्हणजे जीवात्मा, जीव प्राण. विज्ञायते अनेन इति विज्ञानः किंवा विजानाति इति विज्ञानः। ज्याला जाणीव आहे, ज्याच्यामुळे सर्व जाणले जाते तो जीवात्मा म्हणजे विज्ञानपुरुष. हाच खरा पहाणारा, स्पर्श करणारा, ऐकणारा इ० इंद्रिये, मन, बुद्धी अहंकार, चित्त ही त्याची साधने. या साधनांच्या द्वारा तोच भोग घेत असतो. त्याला आधार काय? कोणाकडून ही शक्ती त्याला प्राप्त होते? परमश्रेष्ठ पुरुषोत्तम जो अक्षर आहे त्या परमात्म्याकडून ही शक्ती त्याला मिळते. त्याच्या आधारावर हा ह्या सर्व गोष्टी करतो.

समष्टीमध्ये (जीवात्म्याप्रमाणे) हिरण्यगर्भ असतो. विश्वातील सर्व गोष्टी त्याच्यावर आश्रित व तो परमात्म्यावर आश्रित. अशी ही ब्रह्मांडाची व व्यष्टीची रचना आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

8 am परम् एव अक्षरं प्रतिपद्यते सः यः ह वै तत् अच्छायम्
अशरीरं अलोहितं शुभ्रम् अक्षरं वेदयते यः तु सोम्य
9 सः सर्वज्ञः सर्वः भवति। तत् एषः श्लोकः ॥१०॥

10 अर्थ- हे सोम्य! हे शिष्या! जो पुरुष निश्चितच छायारहित
उपाधिरहित, रंगरहित, शुभ्र अशा अक्षरस्वरूपाला जाणतो
11 तो सर्वज्ञ होतो, तोच सर्वात्मस्वरूप होतो. असा हा श्लोक।

12 विवेचन- ह्या पाहणाऱ्या, ऐकणाऱ्या, सर्व क्रिया करणाऱ्या
जीवाला कोण शक्ती पुरवतो? तो परमात्माच या जीवाला
1 pm या सर्व शक्ती देतो. तो कसा आहे? तो निश्चितच
छायारहित आहे. तो स्वतः स्वयंप्रकाशी आहे. दुसऱ्या कुणाचा
2 प्रकाश पडला तर छाया संभवणार. हा प्रकाशरूप व प्रकाशा-
पुढे तम रहात नाही, म्हणून हा तमोगुणरहित आहे. याला
3 शरीर नाही म्हणून छायेचा प्रश्न नाही. शरीर क्रिया करणारे,
नामरूपी उपाधीयुक्त. याला सीमाच नाही ~~म्हणून~~ छायेचाही
4 ~~प्रश्न नाही~~. शरीर नाही- रंग नाहीत - त्रिगुण नाहीत म्हणून
हा शुभ्र, केवळ शुद्ध. अशा अक्षर, अविनाशी ब्रह्माला जो
5 जाणतो त्याचा जो अनुभव घेतो तो तेच बनतो. त्यामुळेच
तो सर्व होतो व सर्वज्ञही होतो.

6 परमात्म्यामध्ये आत्मा विलीन झाला की परमात्म्याचे
सर्व गुण जे त्याच्या ठायी असतातच ते प्रगट होतात.
7 तुकाराम महाराजांप्रमाणे बहिणाबाईच्या गाईला मारलेल्या
फटक्यांचे वळ त्यांच्या अंगावर उठतात.

Birthday / Anniversary

© www.madhaveeradhuvear.com

| April 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

विज्ञानात्मा सह देवैः च सर्वैः प्राणाः भूतानि
सम्प्रतिष्ठन्ति यत्र । तदक्षरं वेदयते यः तु सोम्य
स सर्वज्ञः सर्वम् एव आविवेश इति ॥११॥

अर्थ - हे सोम्य! ज्या ठिकाणी सर्व देवांच्यासहित विज्ञानात्मा जीव, सर्व प्राण, सर्व पंचमहाभूते प्रतिष्ठित होतात, त्या अक्षरस्वरुपाला जो जाणतो, तो सर्वज्ञ पुरुष सर्वांच्यामध्ये प्रवेश करतो.

विवेचन - या अक्षर अविनाशी परमतत्वात ह्या (सर्व) प्राण, पंचमहाभूते व सर्व इंद्रियासहित विज्ञानात्मा (जीव) पूर्णपणे विलीन होतो, हे सोम्य, त्या अक्षर अविनाशी तत्वाला परब्रह्माला जो जाणतो म्हणजे अनुभवतो तो सर्वज्ञ होतो व सर्वांमध्ये प्रवेश करतो. विश्व होऊन विश्वात रहातो. कारण ब्रह्मासारखाच तो परब्रह्म होतो. जिथून उत्पन्न होतो तिथेच विलय होतो.
ही इंद्रिये मनात, मन प्राणात विलीन पावते. सृष्टीत ही सर्व पंचमहाभूते त्यांनी बनविलेल्या सर्व सजीव निर्जीव वस्तूंसह हिरण्यगर्भात एकरुप होतात व तिथून सर्व परब्रह्मात विलीन पावतात.
या अक्षरस्वरुप परमात्म्याला जो जाणतो तोच सर्वज्ञ होऊन तो पुरुष सर्वांच्यामध्ये प्रवेश करतो. तो सर्वात्मस्वरुप होतो. याचा अर्थच जो तीव्र विरक्त, वैराग्य संपन्न आहे तोच अज्ञानजन्य सर्व प्रत्ययांचा निरास करुन सर्वात्मस्वरुप होतो तो सर्व ठिकाणी आत्मस्वरुपाच्या दृष्टीने पहातो.



© www.madhavbhave.com

## पञ्चमः प्रश्नः

अथ हैनं शैब्यः सत्यकामः पप्रच्छ।
स यो ह वै तद्भगवन्मनुष्येषु प्रायणान्तमोंकारमभ्यध्यायीत। कतमं वाव स तेन लोकं जयतीति तस्मै स होवाच॥१॥

अर्थ - यानंतर पिप्पलाद मुनींना शिबिपुत्र सत्यकाम याने प्रश्न विचारला की, हे भगवन्, मनुष्यांमध्ये जो कोणी पुरुष मृत्युपर्यंत ओंकाराचे चिंतन करेल तो कोणत्या लोकावर जय मिळवतो? यावर पिप्पलाद मुनी म्हणाले -

विवेचन - अपरब्रह्म व परब्रह्म यांच्या प्राप्तीचे साधन म्हणजे ओंकारोपासना आहे. अध्यात्ममार्गामध्ये अनेक मंत्रांची उपासना करणारे अनेक साधक आहेत. परंतु यांच्यामध्ये ओंकार उपासना करणारा साधक अत्यंत दुर्मिळ आहे. ओंकार हा बीजमंत्र आहे. ही उपासना विशिष्ट काळापर्यंत न करता उपासक आयुष्यभर करतो. तो श्रद्धा भक्तीयुक्त अंतःकरणाने ओंकारामध्ये ब्रह्मभाव निर्माण करून ओंकारोपासना करतो. त्यावेळी तो ओंकाराव्यतिरिक्त असणाऱ्या अन्य सर्व विषयवृत्तींचा निरास करतो. बाह्य विषयासक्ति, भोगासक्ती यापासून पूर्णतः निवृत्त होतो. अंतःकरणामध्ये एकच एक अखंडाकार आत्मवृत्ति, ओंकारवृत्ति निर्माण करतो.

ॐकारं बिन्दुसंयुक्तं नित्यं ध्यायन्ति योगिनः।
कामदं मोक्षदं चैव ओंकाराय नमो नमः॥

Birthday / Anniversary

© www.mahaveeraghuveer.com

तस्मै सः ह उवाच एतम् वै, सत्यकाम परं च अपरं च ब्रह्म यत् ॐकारः। तस्मात् विद्वान्-एतेन एव आयतनेन एकतरम् अन्वेति॥ २॥

अर्थ- पिप्पलाद मुनि त्या सत्यकामास म्हणाले की, हे सत्यकाम! हा ओंकारच निश्चितपणे पर व अपर ब्रह्म आहे. म्हणून विद्वान उपासक याच्याच सहाय्याने पर व अपर यापैकी कोणत्यातरी एका ब्रह्मास प्राप्त करतो.

विवेचन- सर्व इंद्रिये मनात, मन प्राणात व प्राण परब्रह्मात एकरूप होतो. असे एकरूप होण्यास उपासना हवी. ॐकारोपासना ही सर्व उपासनांमध्ये श्रेष्ठ मानली जाते. मोठ्या मंत्रापेक्षा बीजमंत्र महत्त्वपूर्ण मानतात. इथे ॐ हा एकाक्षरी मंत्र ही आहे व बीजमंत्रही आहे.

ज्याप्रमाणे आपण विष्णूच्या प्रतिमेमध्ये विष्णूची उपासना करतो त्याचप्रमाणे ओंकारामध्ये परब्रह्माची उपासना करावी. निकृष्ट वस्तूमध्ये उत्कृष्ट वस्तू पहाणे यालाच प्रतीक किंवा प्रतिमा उपासना म्हणतात. शाळिग्राममध्ये विष्णु पहाणे, लिंगामध्ये शिव पाहणे या सर्व प्रतीक उपासना आहेत. त्याप्रमाणे ओंकारोपासक ओंकारामध्ये ब्रह्मस्वरूप पाहून त्यामध्ये ब्रह्मभाव निर्माण करतात. या उपासनेने प्रथम अपरब्रह्माची म्हणजेच हिरण्यगर्भाची प्राप्ती होते. म्हणजेच साधकाला हिरण्यगर्भाचे दैवी गुण प्राप्त होऊन त्याचे मन शुद्ध, अंतर्मुख, सत्त्वगुणप्रधान होते. त्यानंतर त्याला ज्ञानप्राप्ति होऊन क्रमाने परब्रह्मस्वरूपाची प्राप्ती होते. म्हणून अंतकाला आत्मप्राप्तिसाठी ओंकारसाधना हेच साधन आहे.

एतदालम्बनं श्रेष्ठं एतदालम्बनं परम्।
एतदालम्बनं ज्ञात्वा ब्रह्मलोके महीयते॥ कठ ३५.
६.२.१०.

Birthday / Anniversary

© www.madhuraveeraghuveer.com

8 am स: यदि एकमात्रम् अभिध्यायीत स: तेन एव संवेदित: तूर्णम् एव जगत्याम् अभिसम्पद्यते। तम् ऋच: मनुष्यलोकम् उपनयन्ते। स: तत्र तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया सम्पन्न: महिमानम् अनुभवति ॥३॥

अर्थ- जर त्या उपासकाने एका मात्रेचे अभिध्यान केले तर तो साधक संस्काराच्या प्रभावाने त्वरित पृथ्वी-लोकावर येतो. त्या उपासकाला ऋग्वेदामधील ऋचा मनुष्यलोकाला घेऊन जातात. मनुष्यशरीरामध्ये येऊन तो उपासक तेथे तपस ब्रह्मचर्य व श्रद्धेने युक्त होऊन स्वत:चा महिमा अनुभवतो.

विवेचन- जो ॐकारातील 'अ'ची उपासना करतो त्याला काय फळ मिळते? 'अ' 'उ' 'म' हे भू: भुव: स्व: चे प्रतिक मानले जातात. तसेच ते ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेदाचे प्रतीक मानले जातात.

उपासक जर 'अ' या मात्रेची उपासना करीत असेल 'अ' चेच ध्यान करत असेल तर त्या उपासनेच्या जोरावर तो तत्काळ मृत्युलोकाला प्राप्त करतो. ऋग्वेद हा पृथ्वीचा वेद आहे म्हणून ऋचा त्याला मनुष्यलोकी पोचवतात. त्या मनुष्यलोकात तो तप करतो. ब्रह्मप्राप्तीसाठी ब्रह्मचर्याचे पालन करतो व अत्यंत श्रद्धेने आपली उपासना करत रहातो. त्या लोकी तो ऐश्वर्य, प्रतिष्ठा महिमा प्राप्त करून रहातो.

अशा रीतीने 'अ'ची उपासना मनुष्य जन्म देणारी, सुख समृद्धी देणारी, श्रद्धा तप- ब्रह्मचर्याचे आचरण करण्याची शक्ती, बुद्धी देणारी आहे.

Birthday / Anniversary

अथ यदि द्विमात्रेण मनसि सम्पद्यते।
सः अन्तरिक्षं यजुर्भिः उन्नीयते सोमलोकम्।
सः सोमलोके विभूतिम् अनुभूय पुनरावर्तते॥४॥

**अर्थ-** जर तो उपासक दोन मात्रांनी युक्त असणाऱ्या ओंकाराचे मनामध्ये चिंतन करेल तर तो यजुर्वेदामधील श्रुतींच्या द्वारा अंतरिक्षामध्ये स्थित असलेल्या सोम-लोकाला नेला जातो. त्यानंतर सोमलोकामध्ये विभूतींचा अनुभव घेऊन तो पुन्हा मनुष्यलोकाला प्राप्त होतो.

**निवेदन** - उपासक जर अ व उ ह्या दोन वर्णांची, मात्रांची उपासना करीत असेल तर तो मनोमय चंद्रलोक प्राप्त करतो. यजुर्वेद हा अंतरिक्षाचा वेद आहे. तो यजुर्वेदातील मंत्रांकडून अंतरिक्षात असलेल्या चंद्रलोकापर्यंत वर नेला जातो. तिथे तो चंद्रलोकात मोठ्या ऐश्वर्याचा उपभोग घेऊन पुन्हा भूलोकावर येतो. अशा रीतीने ॐकाराच्या दोन मात्रांची उपासना भुवर्लोकापर्यंत घेऊन जाते. चंद्रलोकात गेलेला माणूस परत येतो. पण काही काळ तिथे वास्तव्य करण्याचे भाग्य त्याला लाभते.

उपासक जर ओंकाराच्या द्वितीय मात्रेला प्राधान्य देऊन ओंकारोपासना करत असेल तर त्याला मनरूपी आत्मभाव प्राप्त होतो. उकार ही मात्रा अकारापेक्षा सूक्ष्म आहे. श्रेष्ठ आहे. उकाराच्या उपासनेने साधक समष्टि सूक्ष्म शरीराशी म्हणजेच हिरण्यगर्भाशी तादात्म्य पावतो. हिरण्यगर्भ म्हणजेच अपरब्रह्म किंवा कार्यब्रह्म होय.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

यः पुनः एतं त्रिमात्रेण ॐ इति एतेन एव अक्षरेण परं पुरुषम् अभिध्यायीत सः तेजसि सूर्ये सम्पन्नः। यथा पादोदरः त्वचां विनिर्मुच्यते एवं ह वै सः पाप्मना विनिर्मुक्तः सः सामभिः उन्नीयते ब्रह्मलोकं सः एतस्मात् जीवघनात् परात्परं पुरिशयं पुरुषम् ईक्षते। तत् एतौ श्लोकौ भवतः॥५॥

<u>अर्थ</u>- जो पुन्हा त्रिमात्रा विशिष्ट ॐ या अक्षराने या परम पुरुषाची उपासना करतो तो तेजोमय सूर्यलोकामध्ये स्थिर होतो. ज्याप्रमाणे साप कातीमधून मुक्त होतो त्याप्रमाणे तो उपासक निश्चित सर्व पापांच्यामधून मुक्त होतो. तो सामश्रुतींच्या द्वारे ब्रह्मलोकामध्ये नेला जातो. तो या जीवनापेक्षाही उत्कृष्ट, हृदयामध्ये स्थित असणाऱ्या परमपुरुषाला पाहतो. याच विषयात पुढील दोन श्लोक आहेत.

<u>विवेचन</u> - जो उपासक ॐकाराची उपासना तीन मात्रांनी करतो म्हणजेच संपूर्ण ॐकाराची उपासना करतो त्याचे काय होते? पण आता ही उपासना ध्वनीची नाही, ब्रह्मांडाची नाही, चंद्रलोकाची नाही तर हे त्या पुरुषोत्तमाचे नाव आहे असे समजून ॐकाराने त्या परमपुरुषाचे जर तो ध्यान करील तर तो तेजस्वी अशा सूर्यलोकाला प्राप्त होईल. साप आपली जुनी त्वचा टाकून देऊन जसा नुकतुकीत व तेजस्वी होतो तसा हा उपासक पापांच्या कवचापासून मुक्त होतो. अहं चे कवच सुटते. त्यामुळे तो निर्लेप, तेजस्वी व चैतन्यरूप होतो. सामांतील मंत्र त्याला ब्रह्मलोकी घेऊन जातात. तिथे तो या जीवनघन चैतन्यरूपाने असतो व तो परात्पर, सर्वश्रेष्ठ, सर्व देहात वास्तव्य करणाऱ्या, सर्वांचा आत्मा असणाऱ्या पुरुषोत्तमाचे दर्शन करतो.

Birthday/Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

6 THU MAY 2010 Priority

May 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

Wk 18, 126-239

8 am तिस्रो मात्रा मृत्युमत्य: प्रयुक्ता अन्योन्यसक्ता अनविप्रयुक्ता: क्रियासु बाह्याभ्यन्तरमध्यमासु सम्यक्प्रयुक्तासु न कम्पते ज्ञ:॥६

9 अर्थ - ओंकाराच्या तिन्हीही मात्रा मृत्यूने युक्त आहेत. जर

10 या तिन्ही मात्रा विशिष्ट असणाऱ्या ध्यानप्रक्रियेने प्रयुक्त करुन त्यांचा एकमेकांशी संबंध ठेवला, त्या

11 मात्रांचा एकमेकांशी वियोग होऊ न देता उपासकाने जर बाह्य, अभ्यन्तर व मध्य या मात्रा सम्यक् रीतीने

12 प्रयुक्त केल्या तर तो विद्वान पुरुष विचलित, कंपित होत नाही.

1 pm विवेचन. ओंकाराच्या या तीन मात्रा म्हणजे जागृती,

2 स्वप्न, सुषुप्तीच्या प्रतीक आहेत. या एकमेकांना जोडून जर उपासना केली तर ती मृत्युयुक्त आहे.

3 ब्रह्मांडाच्या आतील सर्व (अगदी ब्रह्मलोकसुद्धा) नष्ट होणारे आहे. महाप्रलयात सर्व लय पावते. या ओंकाराची

4 उपासना ब्रह्मलोकापर्यंत नेणारी आहे.

बाह्य - मध्यम - अभ्यंतर क्रियांमध्ये या ओंकाराच्या

5 तिन्ही मात्रांचा यथायोग्य उपयोग केल्यास माणूस ब्रह्मांड जाणणारा 'ज्ञ' होते. ओंकार हे त्या परब्रह्माचे

6 नाव आहे. आपण त्या शक्तीचा जप करतो, तिच्याशी एकरूप होतो या भावनेने उपासना केल्यावर सर्व

7 क्रियांमध्ये त्याच्या शक्तीचाच प्रत्यय येत राहील. व अशा रीतीने सर्वत्र त्या शक्तीचा प्रत्यय घेणारा 'ज्ञ' बनतो व तो स्थिर होतो. तो कशानेही कंपित होत नाही, विचलित होत नाही.

Birthday / Anniversary

© www.madhavee raghuveer.com

ऋग्भिः एतं यजुर्भिः अन्तरिक्षं सामभिः यत् तत् कवयः वेदयन्ते। तम् ओङ्कारेण एव आयतनेन अन्वेति विद्वान् यत् तत् शान्तम् अजरं अमृतं अभयं परं च इति ॥७॥

**अर्थ** - ऋकमंत्रांच्या सहाय्याने उपासक मनुष्यलोक प्राप्त करतो. यजुर्वेदामधील मंत्रांच्या सहाय्याने चंद्रलोक प्राप्त करतो. साममंत्राच्या सहाय्याने ब्रह्मलोक प्राप्त करतो. जे स्वरूप फक्त विद्वानच जाणतात ते स्वरूप तो उपासक ओंकाराच्या आलंबनानेच प्राप्त करतो. ते स्वरूप शांत, जरारहित, मृत्युरहित, भयरहित व निरतिशय आहे.

**विवेचन**. एकमात्रेचा उपासक ऋग्वेदातील ऋचांनी हा लोक मृत्युलोक प्राप्त करून घेतो. दोन मात्रांचा उपासक यजुर्वेदातील मंत्रांनी अंतरिक्ष-चंद्रलोक प्राप्त करून घेतो आणि तीन मात्रांचा उपासक सामांनी त्या ब्रह्मलोकी पोचतो ज्याला 'कवि' म्हणजे श्रेष्ठ ज्ञानी जाणतात. या ओंकाराच्या आधारानेच विद्वान, ज्ञानी त्या पर-श्रेष्ठ, शांत, अजर, अमृत, अभय अशा परब्रह्माला प्राप्त करतात. ती परमशक्ती क्षोभरहित, जरारहित, विकाररहित, अमृतमय आहे. सर्वत्र एकाच शक्तीचे वास्तव्य असल्याने भयाचा प्रश्नच येत नाही.

ज्याप्रमाणे विजेने २५ व्होल्ट, ६०, ८०, १०० चा दिवा जसा लावू तसा लागतो त्याप्रमाणेच ॐकार शक्तीने आपापल्या कुवतीनुसार, संकल्पानुसार, तपानुसार, श्रद्धेनुसार - आपण हवे ते प्राप्त करू शकतो.

इथे सत्यकामाचा प्रश्न होता. ॐकारोपासनेने कुठला लोक मिळतो? त्याचे उत्तर असे की आपण जशी साधना करू त्याप्रमाणे ओंकारोपासनेने या पृथ्वीलोकापासून परब्रह्मापर्यंत सर्व काही प्राप्त करू शकतो.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

12 April 2013

## षष्ठः प्रश्नः

अथ ह एनं सुकेशा भारद्वाजः पप्रच्छ भगवन् हिरण्यनाभः कौसल्यः राजपुत्रः माम् उपेत्य एतं प्रश्नम् अपृच्छत। षोडशकलं भारद्वाज पुरुषं वेत्थ? तम् अहं कुमारम् अब्रुवम्- न अहम् इमं वेद, यदि अहम् इमम् अवेदिषं कथं ते न अवक्ष्यम् इति। समूलो वः परिशुष्यति यः अनृतम् अभिवदति, तस्मात् न अर्हामि अनृतं वक्तुम्। सः तूष्णीं रथम् आरुह्य प्रवव्राज। तं त्वा पृच्छामि क्व असौ पुरुषः इति॥ १ ॥

अर्थ- मग भरद्वाजाचा पुत्र सुकेशा पुढे झाला व त्याने पिप्पलादांना विचारले - भगवन्! कोसल देशाचा राजकुमार हिरण्यनाभ माझ्याजवळ येऊन त्याने मला प्रश्न विचारला की आपण १६ कला असणाऱ्या पुरुषाला जाणता का? यावर मी त्या राजकुमाराला म्हणालो की मी या षोडश कल पुरुषाला जाणत असतो तर तुझ्यासारख्या गुणी शिष्यास मी का बरे त्याचे ज्ञान दिले नसते? जो पुरुष खोटे बोलतो, तो मुळासह शुष्क कोरडा होतो. यामुळे मी खोटे बोलणे योग्य नाही. हे ऐकल्यावर तो राजकुमार शांतपणे रथात बसून निघून गेला. (पण ही गोष्ट माझ्या मनाला लागली. त्याने विश्वासाने विचारलेल्या प्रश्नाला मी उत्तर देऊ शकलो नाही) तेव्हा आता मी तुम्हाला तो प्रश्न विचारतो - हा सोळा कलावाला पुरुष कुठे असतो?

विवेचन- ब्रह्मज्ञान हे कोणत्याही जाती, धर्म, वर्णावर अवलंबून नाही हे राजपुत्र या शब्दावरून स्पष्ट होते. तो वयाने कुमार असून बुद्धीने परिपक्व आहे. इथे भरद्वाज मुनी आपल्या शिष्यासमोर आपले अज्ञान उघड करतात.

तस्मै स: ह उवाच इह एव अन्त:शरीरे सोम्य, स पुरुष: यस्मिन् एता: षोडश कला: प्रभवन्ती। इति॥२॥

अर्थ - पिप्पलाद मुनी त्या शिष्याला म्हणाले - हे सोम्य! ज्याच्यामधून सोळा कला उत्पन्न होतात तो पुरुष याच शरीराच्या आत रहातो.

विवेचन - परब्रह्म सोळा कलांनी युक्त असते. परिपूर्ण असते तेच ब्रह्म समष्टिच्या विराट शरीरात व व्यष्टित माणसाच्या शरीरात उपस्थित असते (निष्कल)

या शरीराच्या आत म्हणजे हृदयाकाशामध्ये तो पुरुष रहातो. त्याच्यामधूनच या सोळा कला निर्माण होतात. त्या पुरुषाचे यथार्थ स्वरूप जाणणे हे प्रत्येक जीवाचे कर्तव्य आहे. हा अक्षरस्वरूप पुरुष 'विज्ञेय' म्हणजे ज्ञानाचा विषय आहे. हा पुरुष कर्म - उपासनेचा विषय नाही. त्या पुरुषाला शोधण्यासाठी अन्य कोणत्याही स्थानामध्ये जाण्याची आवश्यकता नाही. हा स्वभावत: निर्गुण, निरवयव, निरुपाधिक असूनही तो कलांच्यामुळे सगुण सावयव झाल्यासारखा भासतो.

अन्य सर्व व्यावहारिक ज्ञान बुद्धीच्या सहाय्याने घेता येते. परंतु आत्मज्ञान घ्यायचे असेल तर साधकाला गुरुची नितांत आवश्यकता आहे. साधकाने हातात समिधा घेऊन श्रोत्रिय आणि ब्रह्मनिष्ठ गुरुलाच शरण जावे.

समित्पाणि - शरणभाव

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

May 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

सः ईक्षांचक्रे "कस्मिन् अहम् उत्क्रान्ते उत्क्रान्तो भविष्यामि? कस्मिन् वा प्रतिष्ठिते प्रतिष्ठास्यामि? इति॥

अर्थ- त्याने (षोडशकल पुरुषाने) पाहिले (विचार केला) कोणाच्या उत्क्रमणाने माझे उत्क्रमण होईल? व कोणाच्या स्थापनेने माझी सुद्धा स्थापना होईल?

विवेचन- त्या परब्रह्माने पंचमहाभूते निर्माण केली. त्या पंचमहाभूतांनी भिन्न भिन्न शरीरे निर्माण केली. त्यांच्यात जिवंतपणा येण्यासाठी त्या प्रत्येक शरीरात मला रहावे लागेल. मी तर असा सूक्ष्म की कुणालाच मी दिसणार नाही. मग त्याने असा विचार केला की, मला अशी काहीतरी वस्तू निर्माण केली पाहिजे व ती त्या शरीरात (प्रत्येक) घातली पाहिजे की जी माझ्या अस्तित्वाची खूण असेल. जे बाहेर निघाले तर मी बाहेर गेलो आहे हे समजून येईल आणि जे प्रस्थापित असेल तर मी प्रस्थापित आहे हे कळून येईल. जसा साहेबांच्या केबिनच्या बाहेर हिरवा-तांबडा दिवा असतो. त्यावरून साहेब आत आहेत किंवा नाहीत हे कळून येते.

Birthday / Anniversary

© www.madhavraghuveer.com

स: प्राणम् असृजत, प्राणात् श्रद्धां खं वायुः ज्योतिः आपः पृथिवी इंद्रियं मनः अन्नम् अन्नात् वीर्यं तपः मन्त्राः कर्म लोकाः लोकेषु च नाम च ॥४॥

अर्थ - त्या पुरुषाने (सर्वप्रथम) प्राणाला निर्माण केले. प्राणापासून श्रद्धा, आकाश, वायू, अग्नि, जल, पृथ्वी, इंद्रिय मन व अन्न बनविले. अन्नापासून वीर्य, तप, मंत्र, कर्म, लोक व त्यामध्ये नाम बनविले.

विवेचन - त्याने (परब्रह्माने) प्राणाला निर्माण केले. समष्टीचा प्राण वायु व व्यष्टीचा प्राण श्वास. हा श्वास चालू आहे तोपर्यंत त्याचे शरीरात अस्तित्व आहे. श्वास संपला की 'तो' आत नाही. मग बाकी सर्व शरीर-देह, इंद्रिये इ० - जसच्या तसे असले तरी त्याला किंमत नाही. श्वास ही त्याची म्हणजेच जीव प्राणाची खूण आहे. व्यष्टीत जीवप्राण समष्टीत हिरण्यगर्भ. — मग कशाकशाची उत्पत्ति केली? प्रथम प्राणापासून श्रद्धा, मग पंचमहाभूते, त्यानंतर ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये व त्यांना आधीन ठेवणारे मन, नंतर शरीरधारणेसाठी लागणारे अन्न, अन्नापासून वीर्य — पुनरुत्पत्तिसाठी — निर्माण केले. जीवनात आणखी काय हवे? तप, मंत्र, कर्म व भिन्न भिन्न लोक आणि त्या लोकांमध्ये चौदा भुवने - नाम व रूप.

या मंत्रात उत्पत्तिक्रम सांगितला आहे. प्रथम समष्टिचा जीवप्राण हिरण्यगर्भ व व्यष्टिचा जीवप्राण निर्माण केला. नंतर जीव श्रद्धेवर रहातो म्हणून श्रद्धा निर्माण केली. या श्रद्धेमुळेच माणूस कर्माला प्रवृत्त होतो. प्रत्येकाची कशावर तरी श्रद्धा असतेच. कर्मावर, विज्ञानावर सद्गुरूवर, स्वतःवर, सामर्थ्यावर, दैवावर, कशावर तरी श्रद्धा असतेच. तेच त्याच्या जीवनाचे मूल्य ठरते



© www.madhaveeraghuveer.com

व त्यानुसारच तो आपले जीवन जगत असतो.

कार्य करण्यासाठी शरीर हवे. म्हणून पंचमहाभूते निर्माण केली. अवयव हवेत ∴ ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये केली. त्यांच्याकडून काम करवून घेणारे मन तयार केले.

या शरीराच्या पोषणासाठी अन्न हवे. पृथ्वी, जल, तेज व बीज मिळून अन्न तयार झाले. अन्नातून सप्तधातू निर्माण होतात. त्यातील वीर्य-रेत-शुक्र सर्वात महत्त्वाचे कारण त्यातून प्रजनन होणार असते.

सर्व जीव हे स्वभावतःच भोगासक्त व बहिर्मुख आहेत. मनुष्याची इंद्रियेसुद्धा विषयाभिमुखच आहेत. त्यांच्याकडून पापाचरण घडण्याची शक्यता आहे. या निषिद्ध कर्मांच्या परिहारासाठी तप सांगितले आहे. मनुष्याच्या अंगी असणारे सामर्थ्य उपभोगासाठी नसून तपश्चर्येसाठी आहे. मनुष्याची शक्ती विध्वंसक मार्गाने न जाता विधायक मार्गाने जाणे आवश्यक आहे. तेव्हा मनुष्याच्या शक्तीला योग्य दिशा देऊन त्याची अंतर्बाह्य शुद्धि करण्यासाठी शास्त्रामध्ये कायिक, वाचिक, मानसिक तप सांगितले आहे.

मन व इंद्रिये यांच्यावर संयमन करणे हे महान तप आहे. जीवनासाठी आवश्यक कर्म, विचार, साधना सर्व तपच आहे. त्यातून मंत्र स्फुरले. ते जीवनमूल्य, ज्ञान देतात. त्यातून यज्ञयागादि कर्म करण्यास मार्गदर्शन मिळते. तपाच्या सहाय्याने अंतर्बाह्य शुद्ध झालेल्या लोकांच्यासाठी ऋक्, यजुस्, साम व अथर्व हे वेदमंत्र निर्माण केले. प्रत्येक साधकाने वेदांचे नित्य अध्ययन करून वेदोक्त कर्मांचे अनुष्ठान करावे.

वेदो नित्यमधीयतां तदुदितं कर्म स्वनुष्ठीयताम्। असे आचार्य साधनापंचकात सांगतात.

Birthday / Anniversary

© www.madhavraghuveer.com

वेद मनुष्याला विधि-निषेध सांगतात. मनुष्याने कधीही कर्माचा त्याग करु नये. कारण — अकरणे प्रत्यवायः। कर्म न केल्यास प्रत्यवाय दोष निर्माण होतात. विहित कर्म अवश्य करावे. कर्माचे अनुष्ठान केले की फळ हे मिळतेच. त्यासाठीच कर्मानंतर अनेक लोक, अनेक प्रकारच्या योनी - ऊर्ध्वयोनी, अधोयोनी, मध्यमयोनी निर्माण झाल्या. यथा कर्म यथा श्रुतम्

ज्याचे जसे कर्म असेल तसे जीवाला फळ प्राप्त होते. यानंतर अशा या लोकांमध्ये नाम आणि रूप उत्पन्न केले

याप्रमाणे १. प्राण २. श्रद्धा ३. आकाश ४. वायू ५. अग्नि ६. जल ७. पृथ्वी ८. इंद्रिये ९. मन १०. अन्न ११. वीर्य १२. तप १३. मंत्र १४. कर्म १५. लोक १६. नाम अशा सोळा कला पुरुषामधून निर्माण झाल्या.

- ईश्वराने सर्वप्रथम सर्वांवर नियमन करणाऱ्या प्राणास निर्माण केले. प्राण हा सर्व इंद्रियांचा आधार असून तो सर्वांच्या आत राहून विश्वावर व प्राणिमात्रांवरही नियमन करतो. त्याला सूत्रात्मा किंवा हिरण्यगर्भ म्हणतात. यानंतर सर्व प्राणिमात्रांच्या अंतःकरणात श्रद्धा निर्माण झाली. श्रद्धा म्हणजे आस्तिक्यबुद्धी! विश्वनिर्मितीमध्ये श्रद्धा हा अत्यंत आवश्यक घटक आहे. मनुष्यांना जीवन जगण्यासाठी नितांत आवश्यक असणारी श्रद्धा प्रत्यक्ष ईश्वराने निर्माण केली आहे. श्रद्धामयोऽयं पुरुषः। प्रत्येक मनुष्य हा श्रद्धावान आहे. श्रद्धेचा विषय कोणता यावर मनुष्याचे जीवन अवलंबून आहे. श्रद्धेचा विषय जर पैसा, संपत्ति, भोग हा असेल तर आपले जीवनही भोगलंपट होऊन अधःपतित होते आणि श्रद्धेचा विषय जर धर्म, शास्त्र, ईश्वर, गुरु असतील तर आपले जीवनही उदात्त, भव्य-दिव्य होते. धर्मपरायण, सदाचार, सद्गुण वाढतात.



© www.madhavveeraghuveer.com

14 April 2013

सः यथा इमाः नद्यः स्यन्दमानाः समुद्रायणाः समुद्रं प्राप्य अस्तं गच्छन्ति भिद्येते तासां नामरूपे समुद्र इति एवं प्रोच्यते। एवम् अस्य परिद्रष्टुः इमाः षोडश कलाः पुरुषायणाः पुरुषं प्राप्य अस्तं गच्छन्ति भिद्येते च आसाम् नामरूपे पुरुषः इति एवं प्रोच्यते सः एषः अकलः अमृतः भवति। तत् एषः श्लोकः ॥५॥

अर्थ - हा दृष्टांत आहे. ज्याप्रमाणे समुद्र हेच ज्यांचे आश्रयस्थान आहे, अशा प्रवाहित होणाऱ्या सर्व नद्या समुद्राला प्राप्त होऊन समुद्रामध्येच अस्तंगत होतात. त्यांची नामरूपे समुद्रामध्येच लय पावतात. त्यावेळी त्या नद्यांना समुद्र असेच म्हटले जाते. त्याचप्रमाणे हा सर्व बाजूंनी पाहणारा पुरुष हा सर्व कलांचे आश्रयस्थान आहे. या कला पुरुषाला प्राप्त होऊन पुरुषामध्येच अस्तंगत होतात. त्यांची नामरूपे पुरुषामध्ये लीन होतात. तेव्हा त्या कलांना 'पुरुष' असेच म्हटले जाते. जो हे जाणतो, तो स्वतःच कलारहित व अमृतस्वरूप होतो.

विवेचन - अयन म्हणजे गंतव्य स्थान। सर्व नद्यांचे गंतव्य समुद्र हेच आहे. समुद्रायणाः। एकदा समुद्रामध्ये विलीन झाल्यावर वेगळेपणाने त्यांचे अस्तित्व रहात नाही. त्या त्यांच्या मूळ नावाने (कावेरी, नर्मदा, गोदावरी) ओळखल्या जात नाहीत. त्यानंतर त्यांना समुद्रच म्हणतात. त्याचप्रमाणे हा पुरुष पूर्वोक्त सर्व लक्षणांनी युक्त आहे. तो सर्व बाजूंनी पहाणारा सर्वज्ञ आहे. तो सर्व षोडश कलांचे आश्रयस्थान आहे. या सोळा कला पुरुषामध्ये आपल्या सर्व भेदांच्या विशेषत्वाचा, नामरूपाचा त्याग करतात. त्यावेळी या कला पुरुषापासून भिन्न न राहता पुरुषस्वरूपच होतात. हे तत्त्व जो जाणतो तो ब्रह्मज्ञानी पुरुष स्वतःच अमृत व निष्कळ स्वरूप होतो.



© www.madhaveeraghuveer.com

June 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

Priority

SAT MAY 15 2010

Wk 19, 135-230

अरा इव रथनाभौ कला यास्मिन्प्रतिष्ठिताः। तं वेद्य पुरुषं वेद यथा मा वो मृत्युः परिव्यथा इति ॥६॥

अर्थ - ज्याप्रमाणे रथनाभीमध्ये रथाचे सर्व आरे समर्पित होतात, त्याचप्रमाणे ज्या पुरुषामध्ये सर्व कला प्रतिष्ठित होतात, त्या ज्ञेय पुरुषास जाणावे, ज्यामुळे मृत्यु तुम्हाला कधीही व्यथित करणार नाही.

विवेचन - ज्याप्रमाणे रथाच्या चक्राच्या तुब्यामध्ये सर्व आरे प्रतिष्ठित असतात, सूर्यातून किरणे पसरावीत त्याप्रमाणे रथचक्रमध्यातून आरे बाहेर पडतात. त्यांना आधार त्या तुब्याचा असतो. त्याप्रमाणे या सोळा कला त्या परब्रह्मामध्ये प्रतिष्ठित आहेत. या त्याच्यापासून निघतात, त्याच्या आधाराने निघतात. त्या सोळा कलांचे दृश्य रूप म्हणजेच ब्रह्मांड, व्यक्ती आहेत. त्याला जाणणे महत्वाचे. तो वेद्य म्हणजे जाणण्यास योग्य आहे. त्याला तुम्ही जाणून घ्या. म्हणजे मग तुम्हाला तो मृत्यु व्यथित करणार नाही. परब्रह्म सदावर्तमान सत् आहे.

या विश्वामध्ये जे जे जन्माला येते ते आज ना उद्या नाश पावतेच. आपण कितीही रक्षण करण्याचा प्रयत्न केला तरी मृत्यु हा अटळ आहे. प्रत्यक्ष मृत्यु हे मनुष्याच्या दुःखाचे कारण नसून मृत्यूची भीतिच मनुष्याला अधिक दुःखी करते, मृत्यूच्या भीतीपासून मुक्त होणे म्हणजेच मृत्युपासून मुक्ती होय. म्हणजेच अमृतत्वाची प्राप्ती होय. त्यासाठी मृत्युच्या भीतीला कारण असणाऱ्या अविद्येचा निरास झाला पाहिजे. केवळ आत्मज्ञानप्राप्तीनेच जीव मरणभयापासून मुक्त होतो. आत्मज्ञानी पुरुष शोकसागराला पार करतो. तो मृत्यूच्या भीतीने व्यथित होत नाही. उलट तो मृत्यूचे स्वागत करतो. आपले शरीर मृत्यूदेवतेला समर्पित करतो.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

16 SUN MAY 2010 Priority

Wk 19, 136-229

May 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

8 am तान् ह उवाच एतावत् अहम् एतत् परं ब्रह्म वेद।
न अतः परम् अस्ति। इति॥७॥

9 अर्थ - त्या शिष्यांना पिप्पलाद मुनि निश्चितपणे म्हणाले
10 की मी ते परब्रह्म इतकेच जाणतो, यापेक्षा
अधिक काहीही नाही.

11 विवेचन - अशा प्रकारे शिष्यांना उपदेश दिल्यानंतर पिप्पलाद
12 मुनी त्यांना म्हणाले की तुम्हाला आतापर्यंत जेवढे मी
सांगितले तेवढेच परब्रह्मस्वरूपाबद्दल मला माहीत आहे.
1 pm गुरुंच्या या विधानावरच शंका येईल की गुरुंना माहीत
नाही असे आणखी काही ब्रह्माचे ज्ञान आहे का? यावर
2 पिप्पलाद मुनी स्वतःच सांगतात की - यापेक्षा अधिक
काहीही ज्ञान नाही.
3 आत्मलाभ झाल्यावर त्यापेक्षा श्रेष्ठ अधिक कोणताही
लाभ नाही. याचे कारण आत्मलाभामध्ये कोणत्याही
4 प्रकारचा तरतमभाव असत नाही. तर तो निरतिशय,
तरतमभावरहित, स्वाभाविक, स्वस्वरूपाचा आनंद आहे.
5 यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः।
यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते॥६.२२

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

ते तमर्चयन्तस्त्वं हि नः पिता योऽस्माकमविद्यायाः परं पारं तारयसीति । नमः परमऋषिभ्यो नमः परमऋषिभ्यः ॥ ८॥

**अर्थ** - त्या सर्व शिष्यांनी गुरुंची पूजा केली आणि ते म्हणाले की, निश्चितपणे आपण आमचे पिता आहात की ज्यांनी आम्हाला या अविद्यासागरातून पार नेले. म्हणून परमऋषींना (पिप्पलाद मुनींना) नमस्कार असो. परमऋषींना पुन्हा पुन्हा नमस्कार असो.

**विवेचन** - पिप्पलाद मुनींनी उपदेश केल्यानंतर ते सर्व शिष्य अत्यंत तृप्त झाले. त्यांचे मन निरतिशय आनंदाने भरून गेले. त्या शिष्यांनी विचार केला, आपल्या गुरुंनी आपल्याला इतके गुह्यातिगुह्य ज्ञान भरभरून दिले. अशा आपल्या श्रीगुरुंच्या चरणी आपण काय बरे समर्पण करावे? खूप विचार करूनही त्यांना त्या राजविद्या, राजगुह्य आत्मविद्येचे मूल्य ठरवता आले नाही. त्यांना मनोमन समजले की आत्मविद्येची किंमत व्यवहारात मोजता येत नाही.

शेवटी ते सर्वजण अतिशय प्रेमाने व श्रद्धाभक्तीयुक्त अंतःकरणाने आपल्या गुरुच्या जवळ आले. त्यांनी गुरुंची मनोभावे पूजा केली. त्यांना साष्टांग प्रणिपात केला. त्यांच्या अंतःकरणामध्ये गुरुंच्या विषयी पराकोटीचा आदर भाव निर्माण झाला. ते म्हणाले - आपण आम्हाला विश्वातील सर्वांत मोठ्या भयापासून म्हणजेच संसारभयापासून मुक्त केलेत. आम्हाला आत्म्याचे अजर, अमर, अभय स्वरूप प्रदान केलेत. आपण आम्हाला पित्याप्रमाणे पूजनीय आहात.

असे म्हणून परमऋषींना पुन्हा पुन्हा नमस्कार करत आहे. अत्यंत आदर दाखवण्यासाठी आणि



© www.madhaveeraghuveer.com

8 am ग्रंथ समाप्तीची सूचना देण्यासाठी पुनरावृत्ति आली आहे.
शिष्यांच्या मनात गुरुविषयी ईश्वराइतकाच
9 आत्यंतिक आदर भाव निर्माण झाला तरच त्या
शिष्यांच्या अंतःकरणात श्रुतींचे गूढार्थ प्रकट होऊ
10 लागतात. श्रुति म्हणजे त्यांच्यासाठी केवळ शब्द रहात
नाहीत तर श्रुति अर्थरूपाने, अनुभूतीच्या रूपाने साकार
11 होऊ लागतात. त्याला परतत्त्वाचा स्पर्श होतो. त्याला
शास्त्राच्या प्रत्येक शब्दाची साक्षात अनुभूती येते. त्याचे
12 मन इतके सूक्ष्म तरल होते की ते समष्टीशी एकरूप
होते. तो विश्वाशी एकरूप होतो, विश्वाकार होतो. त्याला
1 pm सर्वच ईश्वरस्वरूप दिसायला लागते. तो कृतार्थ, धन्य होतो.
अशा रीतीने सृष्टीच्या निर्मितीपासून परमेश्वर
2 प्राप्तीपर्यंत - त्यासाठी लागणाऱ्या ओंकारोपासनेसह सर्व
ज्ञान अत्यंत सोप्या पद्धतीने पिप्पलादांनी सांगितले.
3 हे जाणणे म्हणजे मनुष्यजन्माचे सार्थक करणे. या
सहा जणांबरोबरच हे ऐकणारे, वाचणारे, याचे मनन करणारे
4 उद्धरून जातात.

5 ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा:
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः
6 स्थिरैरङ्गैः तुष्टुवांसस्तनूभिर्व्यशेम
देवहितं यदायुः ।
7 स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः
स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः
स्वस्ति नस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः
स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

Birthday / Anniversary

॥श्री॥

मनुष्यजन्म हा अत्यंत दुर्लभ असा आहे. असा नरदेह प्राप्त झाल्यावर त्याचे अंतिम उद्दिष्ट काय आहे हे जाणून घ्यायला हवे. स्वतःच स्वतःचा म्हणजे आत्मतत्त्वाचा शोध घ्यायला हवा. आपले जीवन धन्य आणि कृतार्थ कसे करता येईल या दिशेने प्रयत्न करायला हवेत. जीवन का व कसे जगावे हे मूलभूत तत्त्वच समजत नाही आणि म्हणून माणूस दुःखी, अशांत, व्याधियुक्त झाला आहे. उपनिषदांमध्ये या सर्व समस्यांचे निराकरण केले आहे. उपनिषद म्हणजे गुरुशिष्य संवाद!

सर्वच विद्वानांच्या आवडीचे उपनिषद म्हणजे कठोपनिषद! स्वामी विवेकानंदांच्या कार्याचे यथार्थ वर्णन करणारा मंत्र कठोपनिषदातीलच आहे — उत्तिष्ठत, जाग्रत प्राप्य वरान् निबोधत!

या उपनिषदात यम-नचिकेता संवाद आहे. एक कुमारवयीन मुलगा धैर्याने यमाकडे जाऊन आत्मतत्त्वाचे ज्ञान करून घेतो ही घटनाच मोठी आगळी आहे. यात कथा आहे, संवाद आहेत, तत्त्वज्ञान आहे. त्यामुळे या उपनिषदाची रोचकता वाढली आहे. भल्याभल्यांना पडणारे प्रश्न व त्यांची समर्पक उत्तरे यात सापडतात.

गौतमवंशातील उद्दालकाचा मुलगा म्हणजे हा नचिकेता! ज्याला जाणणे कठीण आहे असा नाचिकेता या शब्दाचा अर्थ आहे आणि ~~आ~~ हा नचिकेता तसाच आहे. त्याच्याबद्दल बांधलेले सर्व अंदाज चुकीचे ठरवणारा आणि अनेक गहन प्रश्नांची उत्तरे आपल्यासमोर मांडणारा असा हा नचिकेता आहे.

उद्दालकांनी विश्वजित यज्ञ केला. या यज्ञात सर्वस्वाचे दान करायचे असते. इथूनच कथेला सुरुवात होते. नुकताच यज्ञ संपन्न झाला आहे. आणि ऋत्विजांना, ब्राह्मणांना दान देण्याचा विधी ~~समारंभ~~ सुरू आहे. साहजिकच तिथे असणारा नचिकेता हा ~~कार्यक्रम~~ सर्व ~~विधी~~ कार्यक्रम श्रद्धेने, उत्सुकतेने, कुतूहलाने पाहत आहे. या यज्ञविधिविषयी त्याचेही अध्ययन झाले आहे.



© www.madhaveeraghuveer.com

8 am वडिलांनी चांगल्या चांगल्या दुभत्या गायी देऊन झाल्यानंतर
भाकड गायी दान म्हणून द्यायला सुरुवात केली.
9 वयाने लहान असला तरी विचाराने प्रगल्भ असणाऱ्या
या १०-११ वर्षांच्या मुलाला वडिलांचे हे वागणे पाहून
10 खेद झाला आणि त्याच जोडीला चिंताही वाटली कारण
भाकड किंवा निरुपयोगी गोष्टींचे दान करणे शास्त्रसंमत नाही
11 अशा निकृष्ट ~~वस्तू~~ वस्तूंचे दान देणाऱ्याला नरक किंवा हीन योनी
प्राप्त होते. हे तो जाणत होता. एवढ्या चांगल्या हेतूने सुरू केलेल्या
12 यज्ञाचा समारोप असा चुकीच्या पद्धतीने होणार असेल तर
वडिलांचे अकल्याण होईल अशा विचाराने नाचिकेता अस्वस्थ
1 pm झाला. परंतु सुसंस्कृत असल्याने तो थेट सांगू शकत नव्हता.
तेव्हा त्याने आडवळणाने वडिलांना विचारले — बाबा
2 तुम्ही सर्वस्वाचे दान करत आहात तेव्हा मला कोणाला देणार?
~~यज्ञविधिमध्ये~~ वडिलांनी त्याच्या बोलण्याकडे लक्ष न दिल्याने
3 त्याने पुन्हा २-३ वेळा तोच प्रश्न विचारला. तेव्हा
यज्ञविधिमध्ये अडथळा आणणारे आपल्या मुलाचे प्रश्न ऐकून
4 त्रस्त झालेल्या पित्याने म्हटले — "जा तुला मृत्यूला दिले."
वडिलांचे हे बोलणे ऐकून ~~नचि~~ विवेकी नाचिकेत्याने
5 विचार केला की रागाच्या भरात जरी बोलले असले तरी
त्यांचे बोलणे असत्य ठरू नये. त्यांनी जर मला यमाला दिले
6 आहे तर मला यमाकडे जायलाच हवे. असा विचार करून
नाचिकेता दक्षिण दिशेने यमगृही जाण्यासाठी निघाला. पित्याने
7 तसे करण्यापासून रोखले असता त्याने त्याची सौम्य शब्दात
समजूत घातली व दृढनिश्चयी असा नाचिकेता मार्गस्थ राहिला.
जेव्हा तो यमलोकात पोहोचला तेव्हा यमराज घरी नव्हते
काही कारणासाठी ते बाहेर गेले होते. द्वारपालांनी अडवले असता
यमगृहाच्या दारात हा आश्चर्यचकित मुलगा तीन दिवस तीन रात्री,
काहीही न खाता पिता वाट पाहत होता. जेव्हा यमराज परतले
Birthday / Anniversary तेव्हा या अतिथीचा समाचार घेण्यासाठी त्वरेने धावले.

8 am कारण अतिथि हा देवस्वरूप असतो. अतिथि रागावलेला आगीसमान असतो. तेव्हा त्याला शांत करण्यासाठी, नकळत झालेल्या अपराधाचे परिमार्जन करण्यासाठी नचिकेताजवळ आले. त्याचा आदरसत्कार करून त्याला घरात बोलावले.

तीन रात्र तीन दिवस अन्नपाणी न घेता रहावे लागल्याबद्दल यमराजाने क्षमा मागितली व नचिकेताला तीन वर मागण्याची विनंति केली. यमराजाबद्दल आपल्या मनात आदर वाढू लागतो. प्रत्यक्ष काळ असूनदेखील, सामर्थ्यशाली असलेल्या यमाने एका लहान मुलाची मनधरणी करणे आश्चर्यकारकच वाटते.

1 pm यमराजाने दिलेल्या तीन वरांनी नचिकेता हुरळून गेला नाही. तर विवेकाने त्याचा वापर करण्याचे ठरवले. पहिला विचार आला तो त्याच्या पित्याचा! उद्दालकांनी क्षणिक रागापोटी आपल्याला यमाला देऊन टाकण्याविषयी बोलले. पण वस्तुत: आपले वडील आपल्या काळजीतच असतील. तेव्हा पहिल्या वराने त्यांचा राग शांत व्हावा, त्यांनी ही घटना विसरून माझ्यावर विश्वास ठेवावा. अशी मागणी नचिकेताने यमाकडे केली. ~~दुसऱ्या वराने~~ अग्निविद्या जाणून घेण्याची इच्छा प्रगट केली. अनंत काळ टिकणाऱ्या स्वर्ग लोकांची प्राप्ति करून देणारी अग्निविद्या नेमकी काय आहे? जातवेद म्हणजे काय? अग्निला अर्पण केलेले द्रव्य तो देवतांना कसे पोहोचवतो? अशा अनेक प्रश्नांना यमराजाने सविस्तर उत्तरे दिली. नचिकेताने हे सर्व लक्षपूर्वक ऐकले, जाणले व अग्निविद्येचे हे ज्ञान यमराजांना पुन्हा जसेच्या तसे म्हणून दाखवले. नचिकेत्याची जिज्ञासा, विवेक व तीव्र आकलनशक्ती पाहून यमराज प्रसन्न झाले. त्यांनी आपल्या गळ्यातील मौल्यवान साखळी नचिकेताला दिली व यज्ञाग्निला यापुढे नाचिकेत या नावाने ओळखले जाईल असा आणखी एक वर दिला. इथे साखळी याचा आणखी एक व्यापक अर्थ आहे की विद्यारत्न ही



© www.madhaveeraghuveer.com

एक सारखीच असते. विद्येचे एक ऋण असते. गुरु जेव्हा कोणतीही विद्या शिकवतात तेव्हा शिष्य त्यांच्या ऋणात राहतो. त्या विद्येचे दान पुढे दुसऱ्या शिष्याला देणे म्हणजे त्या विद्याभ्यासात सातत्य राहते व आपोआपच शिष्य गुरुच्या ऋणातून मुक्त होतो. यमराजांची उदारता व गुणग्राहकता या प्रसंगातून दिसून येते.

तिसरा वर मागून घे असे यमराजांनी सांगताच नचिकेता आत्म्याविषयी प्रश्न विचारतो. आत्मतत्त्व म्हणजे नेमके काय? चेतना देणारा नक्की कोण असतो? मला आत्मविद्या ~~म्हणजे काय~~! द्या असा आग्रह नचिकेत्याने यमराजाकडे धरला आहे.

नचिकेत्याच्या विचारांचे सौष्ठव पाहून यमराज प्रसन्न झाले, त्यांना या मुलाचे कौतुक वाटले. परंतु ही आत्मविद्या महान आहे. ती वाटेल त्याच्या हाती देणे योग्य ठरणार नाही. अशा विचाराने यमराजांनी नचिकेत्याला या वराऐवजी वेगळा वर मागण्याचे सुचवले. परंतु तो आपल्या मतावर ठाम होता. शेवटी यमराजांनी नचिकेताला अनेक पर्याय सुचवले. दीर्घायुष्य, भरपूर संपत्ति, पुत्रपौत्र, हत्ती, घोडे, सोने-नाणे, भूमि सर्व कामनांची पूर्ति होईल असा वर माग, रथ, वाद्ये यासह अप्सरा देतो. तू म्हणशील ते द्यायला मी बांधील आहे. परंतु हा वर मागू नकोस. आत्मविद्येला मिळवून तुला काय प्राप्त होणार? त्यापेक्षा यापैकी काहीतरी किंवा सर्व मागून घे.

नचिकेताने शांतपणे हे सर्व ऐकले. इतकेच नाही तर त्यामागील विचारही समजून(?) घेतले. हे(?) सर्व नाशिवंत आहे. हे भोग क्षणभंगुर आहेत, टिकणार नाहीत, वैभव, तारुण्य आयुष्य या गोष्टी संपणाऱ्या आहेत, त्या मला नको. द्यायचेच असेल तर मला आत्मज्ञान दे.

यम नचिकेता संवादाचा हा भाग फार मनोवेधक झाला आहे. जो जो यम हा वर देण्याची टाळाटाळ करत आहे, तो तो नचिकेत्याचा निश्चय दृढ होत चालला आहे. शेवटी आत्मविद्येखेरीज नचिकेता कशाचीही इच्छा करत नाही हे सत्य यमराज पचवतात आणि नेमके आत्मतत्त्व म्हणजे काय? हे गहन गूढ, सुक्ष्म ज्ञान ~~[illegible]~~ सांगायला सुरुवात करतात. नचिकेत्याच्या रूपाने निमित्ताने आपली देखील या आत्मविद्येशी ओळख होते. कल्पना स्पष्ट होत जातात. आणि निखळ व निर्मळ आत्मज्ञान डोळ्यांसमोर उलगडत होत जाते.

प्रेयस व श्रेयसापैकी नचिकेत्याने 'श्रेयस' ची निवड केली आहे. बाकी सर्व भोग क्षणभंगुर आहेत. चिरंतन आहे ते केवळ शुद्ध आत्मज्ञान! तत्काळ मिळणारा लाभ दूर सारून शाश्वत लाभ कशात आहे हे जाणणारा नचिकेता वेगळाच भासू लागतो. ~~[illegible]~~ तो प्रलोभनांना बळी पडत नाही, प्रशंसेच्या आहारी जात नाही, आमिषांनी डगमगत नाही. ~~[illegible]~~ बालस्वरूपात असणारा हा लहानसा मुलगा, ~~[illegible]~~ सुरुवातीला कौतुकाचा विषय वाटत होता परंतु आतामात्र तो आदराचा विषय झाला आहे. त्याला ~~[illegible]~~ वंदन करण्यासाठी आपली मान निश्चितपणे वर जाते. कारण नचिकेत्याच्या विचारांच्या उंचीने मोठी झेप घेतली आहे.

यमराज आता आत्म्याचे स्थान स्पष्ट करतात. सर्व भूतमात्रांच्या हृदयात राहणारे, सर्व विश्वाला व्यापून उरणारे ते सर्वव्यापी तत्त्व, सर्वज्ञानी, सर्वसाक्षी, आहे. त्या शक्तीला नाव नाही परंतु ऋषींनी त्याला ॐकार हे नाव दिले.

ह्या आत्म्याला जन्म नाही मृत्यु नाही. हा सर्व विश्वाला प्रेरणा देणारा आहे परंतु तरी हा स्वतः काहीच करत नाही. हा मरत नाही किंवा मारत नाही. हा अत्यंत दूर व सर्वांजवळ असल्यामुळेच जाणता येत नाही. तो नाशिवंत शरीरात राहतो परंतु अविनाशी आहे.



© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

तो अत्यंत जवळ असून देखील सहजासहजी प्राप्त होत नाही. कुशाग्र बुद्धि असणाऱ्यांना, अध्यात्म श्रवण करणाऱ्यांना, प्रवचने करणाऱ्यांना किंवा ऐकणाऱ्यांना हा प्राप्त होईल असे नाही. मग याला प्राप्त करण्याचा उपाय कोणता? चिंतनाने हा भेटत नाही मग कसा भेटणार? तर याचे उत्तर असे आहे की हा आत्मा ज्याच्यावर कृपा करतो, ज्याला हा निवडतो त्यालाच तो प्राप्त होऊ शकतो. त्याची कृपा झाल्या खेरीज इतर साधने व्यर्थ आहेत. आणि एकदा का त्याची कृपा झाली की सर्व अडथळे आपोआप दूर होतात. जात, पंथ, धर्म, रूप, संपत्ति, ज्ञान, पदव्या, या कोणत्याही गोष्टी आत्मज्ञानापासून रोखू शकत नाहीत.

यमराजांनी हे तत्वज्ञान एका समर्पक रूपकातून स्पष्ट केले आहे. शरीराला रथाची उपमा दिली आहे. त्या रथाचा स्वामी आत्मा आहे. बुद्धि ही सारथी आहे. मन हा त्याचा लगाम आहे. इंद्रिये हे घोडे आहेत त्यांचे विषय म्हणजे शब्द, स्पर्श, रूप रस गंध हे त्यांचे पथ आहेत. जीवात्मा हा भोक्ता आहे. हा रथ जसा जाईल त्यानुसार जीवाला सुखदुःखाचे भोग मिळत असतात.

हा रथ योग्य मार्गाने जावा, आडमार्ग टाळायला हवेत. घोडे बळकट, रथ भक्कम असायला हवा. मनाचा लगाम बुद्धिच्या हातात असेल तर रस्ता चुकत नाही. निश्चित, योग्य निर्णय घेतां येतात आणि असा हा रथाचा स्वामी परमपदापर्यंत, अंतिम ध्येयापर्यंत पोहोचतो.

हा प्रवास आनंददायक होण्यासाठी प्रयत्न काय करायचे? आचरण कसे असावे? तर स्थूलापासून सूक्ष्माकडे जायला हवे. जडाकडून तरलतेकडे ईर्षा हवी. मार्ग कठीण असला तरी गुरुंच्या मार्गदर्शनाने ध्येयाकडे वाटचाल करता येईल त्यासाठी उठा, जागे व्हा आणि



© www.madhaveeraguveer.com

श्रेष्ठ महात्म्यांकडून ज्ञान प्राप्त करून घ्या. म्हणजेच त्या अव्यक्ताला सुद्धा जाणून घेता येईल.

आपल्याला मिळालेली इंद्रिये ही बहिर्मुख आहेत. त्यांना आत वळवायचे. खरं तर ते परमतत्त्व सर्वत्र भरलेले आहे. जसे आत आहे तसे बाहेर आहे. ज्ञानी लोकांना त्या तत्त्वाचे दर्शन होते. त्यांना एकत्वाचा अनुभव येतो. अकरा दारे असणाऱ्या या शरीरात राहून तो सर्वांना चैतन्य पुरवतो. तो सच्चिदानंदस्वरूप आहे. त्याला जाणून घेणे म्हणजे या देहात राहूनही मुक्त होणे आहे.

ते आत्मतत्त्व शुद्ध, तेजस्वी, चैतन्यमय, अमृत आहे त्याला जाणणे म्हणजे जन्ममृत्यूच्या फेऱ्यामधून मुक्त होणे आहे. मृत्युदेवाने सांगितलेली ही विद्या जाणून घेऊन त्याचा अनुभव घेतल्यामुळे नाचिकेता धर्माधर्माच्या पलीकडे गेला. मृत्युरहित झाला. तो स्वतः ब्रह्ममय झाला. दिक्कालाच्या सर्व पाशातून मुक्त झाला.

नचिकेता प्रमाणेच जे या मार्गाने जातील, ज्यांची बुद्धि व्यापक होईल, आचरण शुद्ध असेल त्यांना निश्चितपणे अमृतत्वाचा अनुभव येईल हेच या कठोपनिषदातून आपण बोध घेऊ या. ~~कठोपनिषदाचे नुसते वारंवार वाचन किंवा पठण न करता आचरण करू या~~

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com